## क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय

विद्यावहार (पूर्व), मुंबई ४०००७७


# आशय

मराठी प्रबोधनच्या विद्यार्थ्यांनी चालविलेला मराठी हस्तलिखित अंक

२०१९-२०२०

वर्ष सतरावे

अंक पहिला




Parshuram
2-5-19

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

# आशय

वर्ष वे / अंक पहिला / जुलै २०१९

संस्थापक, मार्गदर्शक : प्रा. डॉ. वीणा सानेकर
मराठी विभागप्रमुख व
प्रभारी प्राचार्या.

या अंकासाठी मार्गदर्शन : प्रा. साधना गोरे.

विद्यार्थी संपादक मंडळ :

| | |
|---|---|
| संपादन : गौरी पाताडे | तृतीय वर्ष कला, मराठी. |
| समिती : रूचिता सावंत | तृतीय वर्ष कला, मराठी. |
| श्रध्दा कदम | प्रथम वर्ष कला |
| अक्षता माने | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| अस्मिता सावंत | तृतीय वर्ष कला, मराठी. |
| रसिका येरम | द्वितीय वर्ष कला |
| परशुराम गावडे | द्वितीय वर्ष कला |

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

# आशय

मराठमोळं नियतकालिक

## या अंकातील लेखक :

गौरी पाताडे
परशुराम गावडे
सुनिता बुनपटटे
वर्षा चाहणे
प्रणाली मोरे
अस्मिता सावंत
तेजश्री नलावडे
श्रद्धा कदम
अभिषेख डोंगरे
उत्कर्ष जोशी
साक्षी दळवी
अक्षता माने
अतुल कसबे
मनिषा तारे
चांदणी तिवारी
अलंकार शेळगे
अक्सा खान

मराठीप्रबोधन

क. जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

# आशय
मराठमोळं नियतकालिक

३० जुलै २०१९.

अंक पहिला


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | मित्रातील पुरूष | गौरी पातडे | तृतीय वर्ष कला | १-६ |
| २. | माझा संघर्ष | अलंकार शेळके | तृतीय वर्ष कला | ७-११ |
| ३. | ते अपयश | परशुराम गावडे | द्वितीय वर्ष कला | १२-१३ |
| ४. | त्या आठवणी | मनिषा तारे | द्वितीय वर्ष कला | १४-१७ |
| ५. | माझे मराठी माध्यम | अभिषेक डोंगरे | द्वितीय वर्ष कला | १८-२१ |
| ६. | त्या दिवशी पाऊस होता | अतुल कसबे | द्वितीय वर्ष कला | २२-२४ |
| ७. | उठा, लोकांनो लढा | अक्सा खान | प्रथम वर्ष कला | २५ |
| ८. | शाळेची सहल | वर्षा चांदणे | तृतीय वर्ष कला | २६-२८ |
| ९. | आम्ही दोघी | चांदणी तिवारी | तृतीय वर्ष कला | २९-३३ |
| १०. | ती | परशुराम गावडे | द्वितीय वर्ष कला | ३४-३५ |
| ११. | बाबा | श्रद्धा कदम | प्रथम वर्ष कला | ३६-३८ |
| १२. | आई | अक्सा खान | प्रथम वर्ष कला | ३९ |
| १३. | माझा छुन-छुस-छुस | परशुराम गावडे | द्वितीय वर्ष कला | ४०-४२ |
| १४. | तुफानं आलंय | उत्कर्ष जोशी | तृतीय वर्ष कला | ४३-४४ |
| १५. | जाणवले मला | गौरी पातडे | तृतीय वर्ष कला | ४५-४८ |
| १६. | असे हे राजकारण | अक्सा खान | प्रथम वर्ष कला | ४९ |
| १७. | माझं घर | साक्षी दळवी | द्वितीय वर्ष वाणिज्य | ५०-५४ |
| १८. | छोटीशी गंमत | मनिषा तारे | द्वितीय वर्ष कला | ५५-५६ |


मराठीप्रबोधन

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

# आशय मराठमोळं नियतकालिक


| | | | |
|---|---|---|---|
| ९ अबोली | गौरी पाताडे | तृतीय वर्ष कला। | ५७ |
| ०. लग्न | सुनिता बनपट्टे | द्वितीय वर्ष कला. | ५८-६३ |
| १. माझं गाव | गौरी पाताडे | तृतीय वर्ष कला. | ६४-६६ |
| २. एन. सी. सी च्या आठवणी | तुषार आमते | तृतीय वर्ष कला. | ७०-७ |
| ३. स्त्री म्हणजे काय? | अफसा खान | प्रथम वर्ष कला। | ७३ |
| ४. मुलीची कहाणी | अक्षता माने | द्वितीय वर्ष वाणिज्य | ७४-७ |
| ५. शेतकरी | अक्षता माने | द्वितीय वर्ष वाणिज्य | ७६- |
| ६. सेल्फी | अक्षता माने | द्वितीय वर्ष वाणिज्य | ७७-७ |

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

# आशय

मराठमोळं नियतकालिक

## मित्रातला 'पुरुष'

मी एकदा अशीच कॉलेजमधुन घरी येत होते. तेव्हा रस्त्यात मला एकदा रिक्षातुन आवाज आला. 'अतोली?' ती रिक्षा माझ्या पुढे निघुन गेली. त्या रिक्षातुन माझी मैत्रिण उतरली. ती माझी शाळेपासुनची मैत्रिण माझं आणि तिचं फार जमायचं एकदा तिचं आणि तिच्या बाजुच्या बाकावर बसणाऱ्या मुलीचं तिच्याशी फार भांडण झालं तेव्हा आम्ही एकमेकांना अगदीच ओळखत नसू तेव्हा ती खूप रडू लागली. मी तेव्हा माझ्या दोन दोन मैत्रिणींसोबत तिच्या एक बाक सोडून मागच्या बाकावर बसत असे. ती रडत आमच्याजवळ आली. आणि म्हणाली. "मी तुमच्या बाकावर बसु का? आम्ही तिला बसू दिलं आणि तेव्हापासूनच आमची खूप चांगली मैत्री झाली. ती आजपर्यंत टिकून आहे. ती खूप सरळ स्वभावाची आहे. एकदा अशीच ती रस्त्यात रिक्षातून उतरली आणि तिच्यासोबत एक मुलगाही होता. तो तिचा 'बॉयफ्रेन्ड' होता. त्याचं नाव सागर होतं तो दिसायला चारचौघांसारखाच होता. आमची भेट झाली. आम्ही तिघेही पुन्हा आमच्या दिशेने जायला निघालो. आम्ही दोघी एकाच रस्त्याने गेलो तर तो त्याच्या घरच्या रस्त्याने गेला. सारिकाने जायच्या रस्त्याने पाहून त्याला बाय केले. मी त्याला पाहिले ही नाही. मग आम्ही सरळ चालत राहिलो.

आम्हाला एकमेकांची खूप सवय. आम्ही एरवी कुणाशीही फार कमी बोलायचो. पण एकमेकांना

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

भेटलो की वेळेचं भान रहायचं नाही. खूप बोलत
रहायचो. रस्त्यात तर रस्त्यात आमचं एक-दीड तास
बोलणं चालायचं त्याच दिवशी संध्याकाळी सागरने
(सारिकाचा बॉयफ्रेन्डने) मला फोन केला आणि
माझ्याशी बोलू लागला. मीही सवयीप्रमाणे
त्याच्याशी बोलत होते. आम्ही खूप वेळ बोलत होतो.
आम्ही खूप गप्पा मारल्या. सारिकाही आमच्या
सोबत कॉन्फरन्सवर होती. आणि नंतर काही कारणांमुळे
तीने आमच्यासोबतचा फोनवरचा संवाद थांबवला मग
आम्ही दोघेच फोनवर बोलत राहिलो. आम्ही बोलत
असताना त्याने मला सांगितलं की त्याने कसं
सारिकाला प्रपोज केलं. ती किती दिवसांनी त्याला
हो म्हणाली त्याचं म्हणणं होतं की ती त्याच्या
आधीच्या गर्लफ्रेन्ड सारखी दिसते. म्हणून त्याला
ती आवडली. ह्यातलं काहीच मला सारिकाने
सांगितलं नव्हतं त्याचा मला अजूनही खूप राग
येतो. तिचं कोणाशीतरी अफेअर आहे हे मला
दीड वर्षांनी तिच्याकडूनच कळलं माझा विश्वासच
बसेना ती शाळेत तर खूप सरळ साधी होती
मला तीने 'व्हाटसप' व त्याचा फोटो ही पाठवला.
तेव्हा मला ते पटलं मग त्याने मला पाहिलं.
कॉल केल्यानंतर आम्ही खूप बोललो. त्यानंतर
पुन्हा अनेकदा मला त्याचे कॉल येत राहिले.
त्यानंतर त्याचे रंगच बदलू लागले. एकदा कॉलवर
तो महेश मला म्हणाला 'I love you' अबोली
मला काहीच कळेना मला सुरुवातीला त्याचा
राग आला. तेव्हा तो म्हणाला नाही गं मी
मस्करी केली मलाही मस्करीच वाटली.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

पण मला कळेना तो माझ्याशी असं का बोलला. असाच तो माझ्याशी याच भाषेत बोलायचा. आणि हे सारिकाला माहित होतं कारण तीही कॉन्फरन्सवर असायची. त्यानंतर तो माझ्या छूपच्यां मागे लागला. मला सतत 'I love you' म्हणत असे मला त्याने या वाक्यावर दोन दिवसात इतकं डिवचलं की मला वाटे त्याच्याशी बोलायलाच नको उगाच आपण याच्याशी फोनवर बोललो किंवा याच्याही उगाचच मैत्री केली. पण ते बोलून झाल्यावर तो पुन्हा म्हणायचा. "नाही गं मी मस्करी केली" राग मानू नको मग मला वाटे मी उगाचं हवदं मनावर होते. मग मी पुन्हा त्याच्याशी बोलत असे. अगदी नेहमी सारखं मला त्याच्या अशा बोलण्याची सवय झाली होती.
मग आम्ही दोन-तीन तास फोनवर बोलत असू आमच्या प्रत्येक कॉलवर सारिका कॉन्फरन्सवर असायची. त्यामुळे तीच्यापासुन काहीच लपून वसायचं तिही म्हणायची दे गं त्याला 'I love you' च्या रिप्लाय मग मला तिचाही राग यायचा. मला पण ती मस्करीच वाटायची पण मला कळायचं नाही तो नक्की हे कोणाच्या हेतून बोलतोय किंवा वागतोय. मला त्याच्या बोलण्याची भितीच वाटायची एक दिवसानंतर त्याने आतीच केलं. मलाचं फोन केला, तेव्हा सारिका नेहमीप्रमाणे कॉन्फरन्सवर नव्हती. तो कॉल उचलायच्या आधीच 'I love you' म्हणायचा असं म्हणून रिप्लाय मागू लागला. मी नेहमी प्रमाणे त्याला हसूने रिप्लाय दिलाच नाही.

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

३० जुलै २०१९.

अंक पहिला

आशय मराठमोळं नियतकालिक

तो माझ्यावर रागवला आणि माझ्यावर मोठ्याने ओरडून मला म्हणाला "तुला किती वेळा सांगायचं? तुला एकदा सांगितलेलं कळत नाही का? मला तू खरंच खूप आवडलेस मी तुझ्याशी लग्नं करेन तुला काय आता छाती फाडून दाखवू का? मी थोडावेळ फोनवरच शांत राहिले. तो हॅलो. हॅलो करत राहिला. मला सतत भेटायलाही बोलवायचा. म्हणायचा सारिकाच्या घरी जाऊ हॉटेलमध्ये जेवायला जाऊ, मुव्ही पहायला येतेस का? मी नकार दिला त्याला त्याचाही खूप राग यायचा. तो मला का म्हणून विचारायचा मी हसण्यावर नाव पुढे करायचे. तो असं का वागायचा हे मला अजूनही कळलं नाही. एक दिवस कॉलेजमध्ये असताना त्याने मला कॉल केला. तेव्हा मी लेक्चरमध्ये होते. सरांनी वर्गात एन्ट्री केली. मी त्याचा उचललेला फोन कट केला. त्यानंतर सर पुन्हा थोड्यावेळासाठी बाहेर गेले. त्याचा पुन्हा मला कॉल आला. मी फोन उचलला. मला म्हणाला फोन कट का केला? मी तुझ्या फोनची वाट बघतोय. तु फिरायला येतेस का? मी नेहमीप्रमाणे नाही असं उत्तर दिलं. त्याने मला विचारलं "की तु कुठेस"? मी वर्गात असं उत्तर दिलं तेव्हा तो मला खोटं ठरवलं म्हणाला नाही तू खोटं बोलतेस स्टेशनवर आहेस ना? मला आवाज येतोय." असं म्हणाला तू कोणासोबत आहेस. मला त्याचा राग आला. मी रागाने फोन कट केला. आणि पुन्हा लेक्चर सुरू झालं तो मला सतत म्हणायचा. " मी तुझी मस्करी करतोय राग मानू नको तो खरंच माझी मस्करी करायचा. मला ते कळायला लागल्यावर मी त्याच्याशी बोलायची पद्धत बदलली. ते त्याला

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

# आशय मराठमोळं नियतकालिक

आवडत नसावं ते त्याला आवडत नसावं एकदा तो असाच त्याच्या मित्राला भेटण्यासाठी आमच्या गल्लीत आला. आणि मला फोन केला. मला म्हणाला की, " मी गल्लीत आलोय, गॅलरीत ये" आमच्या घराला गॅलरी नाही हे त्याला माहित नव्हतं मी त्याला तसं सांगितलही अजूनही तो माझ्याशी फोनवर बोलत होता. मित्राच्या घरी पोचल्यावरही मला ते योग्य वाटलं नाही. की मित्राच्या घरी जाऊन त्याच्यासमोर इतर कोणाशीतरी फोनवर बोलनं तेव्हा मी त्याला म्हणाले," मित्राकडे आलायस ना. मग मित्राशीच बोल तो मला हो म्हणाला आणि त्याने फोन ठेवला. त्यानंतर कधीच त्याने मला फोन केला नाही. एकदा सारिकाशी फोनवर बोलताना मला कळलं की त्याला माझ्या या वागण्याचा राग आला आहे. पण माझ्या असं बोलण्याचा उद्देश त्याला कळाला नसावा. आणि त्याने पुन्हा कधीही मला कॉल केला नाही. मी स्वतः हून त्याला कधीच फोन करत नसे. आणि त्यानंतरही मी त्याला कधीच फोन केला नाही. पण एवढ्या काळात मस्करीतका होईना मी त्याच्या "I love You" चा रिप्लाय दिला नाही. त्याच्यामागे माझी वेगळी फिलोसोफी आहे. मला वाटायचं मस्करीत का होईना पण जर मी या वाक्याचा रिप्लाय त्याला दिलातर मग मी त्याच्यावर खरं प्रेम करते. त्याला किंवा त्याला बोललेल्या या वाक्याला काय अर्थ राहिला. मला ही मस्करी कधी ही आवडणार नाही. आणि मी त्यात सहभागही होणार नाही. मला त्यापेक्षा माझी आणि सारिकाची आठ वर्षांची मैत्री महत्वाची वाटते. या सर्व विचारावर मी सारिकाशी


३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

१ ते दीड तास बोलले व तीच्या मनातल्या शंका पूर्ण केल्या. त्याला (सागरला) माझ्या काही गोष्टींचा राग आला तो मला ते स्पष्ट म्हणाला नाही. पण त्यानंतर पुन्हा कधीच त्याने मला कॉल केला नाही. तो नक्की कोणत्या विचारांचा होता हे मला अजूनही फारसं कळलं नाही. तो सारिकावर अनेक बंधन लादायचा उद: जिन्स घालायची नाही, लग्नानंतर साडीच घालायची. वगैरे-वगैरे तिने जर त्याला हवं तसं किंवा त्याच्या सांगण्याप्रमाणे वागायला हवं होत तर तिच्यातलं त्याला नक्की काय आवडलं ह्या प्रश्नाने मी नेहमी विचारात पडले. तो त्याच पुरुषांमधला निघाला जे आपल्या बायकोवर मालकी हक्क किंवा सत्ता गाजवतात. आणि बायकांना कमी लेखतात.



३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक


# माझा संघर्ष...

माझ्या आठवणीत असे अनेक क्षण आहेत. पण त्यातला माझ्या आठवणीत राहिलं आणि सर्वांनी त्यातून काहीतरी शिकता येईल असा माझ्या आठवणीतला हा एक क्षण आहे.

मला समाजसेवेची प्रचंड आवड आहे. ही आवड मला मी अकरावीत असल्यापासूनच लागली. तेव्हा विचार केला. की आपली स्वतःची एक एन.जी.ओ असावी त्याचा उपभोग तळागाळातल्या गरिब लोकांनी घ्यावा. तसा तर मी स्वतः सर्वसामान्य कुटुंबातला आहे. त्यामुळे मला माहित आहे की. आपल्या सर्वसामान्य लोकांना किती प्रसंगाना तोंड द्यावे लागते. माझ्याबद्दल वाचताना तुम्हाला नक्की हा प्रश्न पडेल की मी स्वतः गरिब घरातला मग मी कशी इतरांना मदत करणार. पण यासाठीचा मोठा पाठिंबा हा माझ्या वडिलांचा आहे. ते नेहमी सर्वांना म्हणात. की स्वप्न खूप मोठी आहेत. आपली स्वप्न आपल्याला जशीच्यातशी पूर्ण करता येणार नाहित. पण माझ्याकडून जे करता येईल ते मी नक्की करेन याच पाठिंब्यामुळे मी आज इथपर्यंतचा प्रवास केला आहे. माझ्या या यशात माझ्या अनेक सहकाऱ्यांनी मला असाच पाठिंबा दिला.

माझ्या आठवणीचा क्षण हा माझ्या संस्थेच्या एका महत्वाच्या कार्यक्रमाचा आहे. हा क्षण खूप छान आनंदाचा नसला तरी यातून अनेक गोष्टी शिकण्या सारख्या आहेत. हे काम करणं व त्यासाठी लागणारी मेहनत खूप होती पण मनात इच्छा होती.

३० जुलै २०१९.
अंक पहिला
क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

आणि आपण हे करायचंच असा निश्चय ही झाला होता. कार्यक्रम असा होता की आज आपण ज्या नगरात राहतो आहोत. त्या नगरात कोणत्यातरी गोष्टीमुळे तेथील लोकांशी आपला संपर्क तुटला आहे. आणि आमच्या मॅरेथॉनच्या उपक्रमामुळे तो वाढू शकतो. अशा उद्देशाने मॅरेथॉन करायची ठरली. सुरवात कशी करायची यासाठीची कोणत्याही प्रकारची कल्पना डोक्यात नव्हती. त्या क्षणी मला वाटले की या उपक्रमासाठी नगरातल्या सर्व राजकीय पक्षांना एकत्र बोलावून त्यांच्याशी चर्चा करून या उपक्रमाची तयारी किंवा सुरवात करता येईल. पण चर्चा ठरवल्या दिवशी अनेक राजकीय नेत्यांना चर्चेच्या बैठकीत उपस्थित राहता आले नाही. किंवा काहींनी त्यांच्याच कार्यकर्त्यांना बैठकीला पाठवले. व बैठकीत झालेल्या चर्चेतून काहीच निष्पन्न झाले नाही. पण त्याच नगरातल्या युवांचे नेतृत्व करणाऱ्या अशा एक अपक्ष व्यक्तीने आम्हाला पाठिंबा दिला.

अपक्ष आहे व तरुण आहे. या एका कारणामुळे आम्हीपण त्यांच्यासोबत काम करायचे ठरवले. त्यांच्यासोबत आमच्या चार बैठका झाल्या. या सर्व गोष्टी व बैठका माझ्याच हातात घडलं असतं तो एक तरुण होता. त्यात तो आमच्यासोबत उठतोय-बसतोय म्हटल्यावर आमचा ही त्यांच्यावर विश्वास होता. त्यासोबत संस्थेमार्फत आम्ही अनेक मोठ-मोठे उपक्रम करायला सुरवात केली. तेव्हा आमच्याकडून आम्हाला जे करता येत होतं ते आम्ही करायला सुरवात केली. व आमच्या उपक्रमाला पहिली सुरवात झाली. व उपक्रमासाठी १ डिसेंबर २०१७ ही तारीख ठरली याचे आयोजक आपणच

मराठी प्रबोधन

३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक


असल्यामुळे मला असं वाटलं की तारीख आपणच ठरवावी. आणि त्यात आम्ही मॅरेथॉनची जाहिरात. त्यांचे बॅनर, आमंत्रण पत्रिका छापल्या व अशा अनेक गोष्टी आम्ही पूर्णत्वाला आणल्या. अनेक राजकारणी लोकांकडून वर्गणीकाढून या सर्व गोष्टी होत होत्या. हळूहळू दिवस सरत होते. १७ डिसेंबर ही तारीख ठरली. याची कल्पना आम्हा सर्वांनाच होती. यासाठी आम्ही प्रत्येक व्यक्तीला विश्वासात घेतलं होतं. कारणं कोणत्याही व्यक्तीला आम्हाला अंधारात ठेवायचे नव्हते. ज्यांनी आम्हाला पाठिंबा दिला. त्यांच्यावर एक जबाबदारी दिली होती. मॅरेथॉन ज्या मार्गावरून धावणार होती. त्याची परवानगी आमच्या नगरातल्या आर.टी.ओ ऑफिसमधून कशी घ्यायची. याची कल्पना आम्हाला नव्हती. मॅरेथॉन हा उपक्रम आमच्या कामराज नगर नगरात पहिलाच आणि या उपक्रमासाठी आम्ही सर्व नवखे होतो. पुन्हा एकदा सांगतो की आम्ही ठरवलं होतं की हा मॅरेथॉनचा उपक्रम करायचा मग त्यासाठी किती का संकट किंवा अडचणी येईनात. मग सर्व गोष्टी झाल्या. आता कार्यक्रमाच्या दिवशी लागणाऱ्या वस्तू, नाश्ता. अशा सर्व गोष्टी बाकी होत्या. या उपक्रमासाठी दोन दिवस बाकी असताना आम्ही उपक्रमाशी संबंधीत महत्त्वाच्या व्यक्तींना भेटायला गेलो. त्यांना या कार्यक्रमासंबंधी सर्व योजनांचे स्पष्टीकरण दिले. पण आम्हाला मॅरेथॉनच्या रोडसाठीची परवानगी हवी होती. मॅरेथॉनचे बॅनर लावून झाले पण परवानगीसाठी सतत फोन करावा लागायचा आणि त्यात उपक्रमाला दोनच दिवस उरले होते. आम्ही रोज चौकीत फोन लावूनही आम्हाला रोडची


परवानगी मिळाली नव्हती. मग हळूहळू सर्व गोष्टी आम्ही करायला सुरवात केली. व एका बाजूने परवानगीची तडजोड चालू होती. आम्ही आमच्या कार्याला पाठिंबा देणाऱ्या व्यक्तीला भेटलो व त्याला विचारलं की आम्हाला परवानगी मिळणार आहे का? कारण आमच्या सहनशक्तीचा आता अंत झाला आहे. तेव्हा त्या व्यक्तीने आम्हाला असे उत्तर दिले की परवानगीला सात दिवस लागतील मग कार्यक्रमाची तारीख पुढे ढकलाल का? ५ मिनिट सर्व वातावरण शांत झालं. आम्ही पाच मिनिट विचार केला आणि सहाव्या मिनिटाला नाही असं उत्तर दिलं. आणि तिथून बाहेर पडलो. या गोष्टीवर आमच्याकडे विचार करायला वेळच नव्हता. आता कृती करायची वेळ आली.

दुसऱ्या दिवशी आठ वाजता घरातून बाहेर पडलो. कागदपत्रांसोबत आणि रात्री नऊ वाजता पंतनगर पोलिस चौकीतून परवानगी घेऊनच आलो. सकाळपासून मी व माझ्या मित्रांनी काही खाल्लं नव्हतं मी या संस्थेचा संस्थापक असल्या कारणाने एकदा आत गेलो की बाहेर येता येत नव्हतं आणि १० ला तिथल्या लहानशा हॉटेलमध्ये जेवण करून परतलो. घरी पोहचलो. तो पर्यंत माझ्या सर्व सभासदांनी बाकीची सर्व तयारी करून ठेवली. परवानगी मिळाल्यामुळे एक सुटकेचा निश्वास टाकला. आणि अक्षरशः सर्व रात्री रडलो. हा उत्साह आणि काही तरी करायची ताकद आपल्या मुलांमध्ये आहे. ह्याचे भाव मला त्यांच्या डोळ्यांमधूनच दिसत होते. याचा पुढचा सर्व खर्च त्यांच्या पालकांनी स्वतः केला.

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

आणि आम्ही सकाळी सहा वाजता. या ठिकाणी पोहचलो. आणि कोणत्याही अडचणी पुढे आल्या तर मागे फिरायचं नाही. तेवढी सकारात्मक ऊर्जा आमच्यात संचारली. सकाळी मला त्यांनी चौकीतून असलं म्हणाले ना. की चांगल केलं तर त्या एका चांगल्या कामाला वर दहा जणांची वाईट नजर असलेचं सकाळी आम्हाला परवानगी मिळाल्यावर रोडची वाट दुसरीकडून त्यांनी असं सांगितलं पण मी ठामपणे सांगितलं परवानगी ज्या मार्गाची त्यांचं मार्गावरून मॅरेथॉन नेणार तरिही पोलिस आल्यावर त्यांनी पुढे जरा मार्ग बदलला आणि त्यानुसार कार्यक्रमाला सुरुवात झाली. आम्ही कार्यक्रमाला सकाळी ७ वाजता सुरवात केली आणि १० वाजता त्याचा शेवट असा हा आमचा लढा आम्ही कायमचं लढत राहू आणि नवयुवकांच्या मनात तो निर्माण करत राहू.





३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

# ते अपयश...

रंगदेवता आणि नाट्यरसिकांना विनम्र अभिवादन करून क.जे. सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय सहर्ष आणि सविनय सादर करीत आहोत.... असे बोलून पडदा उघडला आणि आम्ही सर्वजण रंगमंचावरती उतरलो.

रंगवैखरीची दुसरी फेरी होती. प्रत्येक जण तणावात होता, पण त्यावेळी तणाव असून चालणार नव्हतं. प्रत्येक सिनियर प्रत्येक ज्युनिअर ला धीर देत होता. प्रत्येकाच्या मनात भीतीच्या सैतानाने घर बांधले होते. प्रत्येकाने निश्चय केला आता होऊन जाऊदया काय होतयं ते।

प्रयोग संपला तसा तणाव थोडासा कमी झाला, निकालाची वेळ जवळ आली. निकाल आला. आम्ही तिसऱ्या फेरीत जाऊ शकलो नाही. आम्ही हरलो ती फेरी. ती वेळ खरंच खूप नाजूक होती का हरलो? त्याची कारणं शोधण्याची भानगडीत पडण्याची ती वेळ नव्हती. कारण प्रत्येकाने पराकोटीचा प्रयत्न करून प्रयोगात आपले १००% सादरीकरण दिले होते. त्यामुळे कोणालाही दोष देणे चुकीचे ठरले असते.

त्या दिवसाच्या त्या घटनेचा मी साक्षीदार होतो. मी बघितलेले होते प्रयोगा आधीचे प्रत्येकाचे

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
# आशय
मराठमोळं नियतकालिक

प्रयत्न प्रयोगातील सादरीकरण आणि निकालानंतरचे दुःख मी सर्व बघितले होते. मला स्वतःला पण त्या गोष्टीचे दुःख होते स्वतःचे रडणे बाजूला सारून असे वाटले की प्रत्येकाला सावरावे, पण मनाच्या गाभाऱ्यातून आवाज आला रडू दे रडू दे त्यांना आता जर रडले नाहीतर त्यांना जिंकण्याचे सुख कधीच समजणार नाही. आता जर हे रडले तर त्यांचे दुःख कमी होईल तर पुढच्या वेळी ते नव्या जोमाने तयारीला लागतील कारण कोणालाही हरायचे नसते.

त्या दिवशीची घटना प्रत्येकाच्या मनांवर वेगवेगळा प्रभाव करून गेली, कोणाची मने खचवुन तर कोणाला नव्याने नाटक करण्याची नवी प्रेरणा देऊन गेली. मी सर्वकाही बघत होतो सर्व काही समजत होते पण काय करू त्यावेळी प्रत्येकाच्या मनातले दुःख बाहेर पडणे गरजेचे होते. पण काय करू त्यावेळी, पुढच्या वर्षी रणाबैखरी मुंबईतुनही व संपूर्ण महाराष्ट्रातुन आम्हाला जिंकायची होती. पुन्हा ती तिसरी घंटा सर्वांना ऐकायची होती.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

# त्या आठवणी

माझ्या आयुष्यात तर असे अनेक क्षण आहेत जे जरी व्यक्त करता आले नसले तरी मनात कायमचे रुजू झाले आहेत. ते क्षण कोणत्यातरी क्षणाला गृहीत धरून आठवणीत येतातच. त्या आहेत माझ्या गोष्टी म्हणजे माझ्या मनातल्या आठवणी

मी 'द्वितीय वर्ष कला' शाखेत आहे. मी क.जे. सोमैय्या महाविद्यालयात शिकत आहे. आणि याला आता दोन वर्षे पूर्ण होतील. मी प्रथमवर्षी या महाविद्यालयात आले तेव्हा माझ्यासाठी सगळेच अनोळखी होते. माझ्या आठवणीत फक्त माझी बहिण (चुलत) ती याच महाविद्यालयात असल्याने तीने मला इकडच्या शिक्षकांबद्दल माहिती करून दिली होती. त्याच वीणाबाई व अभिजीत सरांमुळे मी या महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. मग पुढे काय? मी तर फारच बोलक्या स्वभावाची असल्याने पटकन कोणाशीही मिळत-जुळत होणारी आणि मैत्रिणीही अगदी जिवाला-जीव देणारी.

मी प्रथमच जेव्हा मराठी प्रबोधनच्या परिवाराला भेटले, तेव्हा असे वाटले की हेच तर हवे आहे मला. माझी या परिवाराशी पहिली भेट ही त्याच परिवारातल्या मित्रमैत्रिणींच्या हाती झाली. त्याच्या हाती ख्रिसमस पार्टी

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

होती. तेव्हा त्या पार्टित माझ्यासाठी सगळेच
अनोळखी होते. इथूनच सुरु झाली माझी
आणि त्यांची मैत्री मला त्या सगळ्यांसोबत
खूपच छान वाटले होते. त्याच काळात
बघता-बघता माझी बारावी झाली. मी क.जे
सोमय्यात प्रवेश घेतला. मग काय सुरु झाले तेच
संवाद, बोलणे, हसणे, मज्जा-मस्ती करणे

आता मी सगळ्यांची ओळख करुन देते.
अलंकार हा जरी आमचा विद्यार्थी प्रमुख (H.O.D)
असला मग तरी त्याला मराठी प्रबोधनमध्ये
काम करताना जराही घमंड नव्हता. त्याचा
माझ्यावर राग असायचा कारण मी कार्यक्रमात
फार उशीरा पोहचायचे पण स्वभावाने तो खूप गोड,
प्रत्येकाला आपल्या गोड बोलण्याने आपलेसे
करणारा, अस्मिता ही दुसरी (H.O.D) ती जरी
मुलांसारखीच दिसत असली. तरी आम्हाला एक
मुलगी म्हणून तिच्यावर गर्व वाटतो. अशी कामे
ती नक्की करते. आणि आम्हाला त्याचा अभिमान
आहे. आमच्यातली गौरी ही स्वभावाने अतिशय
शांत आहे. पुस्तकांवर तिचे फार प्रेम आहे. तिची
उंची कमी असली तरी तीचे हृदय फार मोठे आहे.
आमच्यातला सुमित कुरडे हा रॉयल स्माईल असून
मैत्रीच्या दुनियेत राजा माणूस आहे. निखिल हा एक
असा मुलगा आहे. जो मस्करी करुन सगळ्यांच्या
डोक्याला ताप देतो. तो कितीही आगाऊ असला
तरी आमचा जवळचा मित्र आहे. आणि माझा जिवलग

मराठी प्रबोधन

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
# आशय
मराठमोळं नियतकालिक

त्यासोबतच विक्रांत, ओमकार, निओ, मयूर, योगी हे ही अजबगजब मित्र-मंडळी मिळाली. गर्लफ्रेन्ड हवी तर दुसऱ्याशी सोडून गेली की तिसऱ्याला बोलायचं मला शोधुन दे. भावेश व अतुल हे दोघेही अंध मुले आहेत पण ते आमच्यात आमच्यातलेच बनुन राहतात. भावेश हा आमच्यात अतिशय प्रेरणादायी मुलगा आहे. कोणी त्याच्याशी बोलले नाही तरी स्वतः हून तो कोणाशीही बोलतो. अतुल हा खूपच सुंदर गातो. तो भविष्यात गायक म्हणून खूप प्रसिद्ध होईल. सुर्यकांत हा ही त्यांच्यातलाच एक तो तर विनाकारणच मला फार घाबरतो. आमच्यात पूनम ही गौरीची छोटी बहिण आहे. ती थोडी फटकळ आहे. पण मैत्रित खूप जवळची आहे. समीर हा माझा खूपच जवळचा आणि चांगला मित्र आहे. त्याच्यासोबत आमच्या जिमख्यान्यातल्या कॅरमच्या आठवणी तसेच कट्ट्यावरच्या सगळ्या आठवणी. त्यात, हास्य, गोंगाट, गोंधळ असायचाच पण तिथे अनेकांशी खूप भांडणेही झाली रडणे झाले, रुसवा, फुगवा झाला हसत-खेळत एक वर्ष संपले.

या एका वर्षात मराठी प्रबोधनच्या खूप स्पर्धा, कार्यक्रम, महाविद्यालयीन स्पर्धा झाल्या या स्पर्धेत अनेक आठवणीत राहणारे क्षण म्हणजे सर्वात प्रथम मराठी प्रबोधनचे उद्घाटन सोहळा आम्ही व आमचे सिनियर आम्ही सर्वांनी मिळून हा सोहळा आनंदाने पार पाडला यात मी निवेदनही केल होत. त्या कार्यक्रमात योगेशने (योगी) खूप चांगले गाणे सादर केले. तसेच नयनचे नृत्य सगळ्यांना भुरळ घालणारे होते. तसेच गायत्रीचा 'ती फुलराणी' हा एकपात्री प्रयोग खूप गाजला. अशा गमती-जमती करत

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग


# आशय मराठमोळं नियतकालिक

हसत - खेळत आम्ही पुढच्याही स्पर्धांमध्ये भाग घेत राहिलो. यात सर्वात आठवणीचा क्षण म्हणजे रंगवैखरीचे भांडणं रंगवैखरी ही खूप मोठी नाट्य स्पर्धा त्यात तुम्हाला ३०-४० मिनिटात नाटक सादर करायचे असते. त्यात, संगीत, नृत्य आणखी वेगवेगळ्या कलांचा समावेश करून नाटक सादर करायचे असते. त्यात आस्मित व अलंकार यांच्यावर महत्वाची जबाबदारी असलेय. नाटकाच्या तयारीसाठी साक्षी, नयन, निकिता यांची चर्चा चालत होत असायची. त्यात मीरा ही असे. असे करत - करत नाटकाची सर्व तयारी झाली आम्ही पहिल्या फेरित खूप चांगला प्रतिसाद दिला. आणि निवडलो गेलो. दुसऱ्याफेरीसाठी तयारी सुरु केली पण आम्ही त्यात निवडलो गेलो नाही. आणि रंगवैखरीसाठी ची तिसरी फेरी अपूर्णच राहिली सर्वांना फारच दुःख झाले. पण आम्ही पुन्हा आपल्या नव्या तयारिला सुरवात केली. कायमचं जिंकण्यासाठीची...

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग




## माझे मराठी माध्यम

पावसाळ्यातील ते दिवस होते. जिकडे पाहावे तिकडे निसर्गातील हिरवाई आणि हिरवाईच्च नजरेस पडत होती. धरतीमातेने जणू काही छान हिरव्या रंगाची शालच्च अंगावर घेतली आहे असे वाटत होते. खरंच निसर्ग हा एक चित्रकार आहे. कितीतरी चित्रं तो रोज रेखाटत असतो. गवतावरील मोत्यासारखे भासणारे दवबिंदू मनाला मोहून टाकणारे होते. अशा या निर्मळ आणि निसर्गरम्य वातावरणातील ही गोष्ट आहे' साधारणत: ५ ते ६ वर्षांपूर्वीची. मला वाटते त्यावेळी मी आठवीमध्ये होतो. सातवीपर्यंतचे शिक्षण हे गावातच एका जिल्हापरिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत झाले होते. मी इयत्ता आठवीमध्ये प्रवेश घेतला तो, गावापासून दुर साधारणत: तीन ते चार किलोमीटर अंतरावर असलेल्या हायस्कूलमध्ये. तेही दुसऱ्या गावात.

हायस्कूलमध्ये त्याच्यवर्षी सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्यात आले होते. माझे याभागाचे शिक्षण हे पूर्णत: मराठीतून झाले होते. आणि इंग्रजी म्हंटल की थोडी भीती मनात होती. सेमी इंग्रजी माध्यम मला जमेल का? त्याचा अभ्यासक्रम मी करू शकेल का? अशा असंख्य प्रश्नांनी माझ्या मनाची द्विधा अवस्था करून टाकली होती. या प्रश्नांनी माझे मन पोखरायला सुरुवात केली होती. वडिलांचा पाठिंबा होताच. वडिलांनी जीवनाकडे

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

नेहमी सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे असे मनावरती बिंबवले होते. पण मनातील भीती व वडिलांनी सेमी इंग्रजीचा सुचवलेला मार्ग यांनी माझ्या मनाची व्दिधा अवस्था करून सोडली होती. या व्दिधा मन:स्थितीत सुरूवातीचे चार-पाच दिवस आठवीच्या 'ब' तुकडीत बसलो, कारण सेमी इंग्रजी हे केवळ आठवी 'अ' वर्गासाठी होते. सहाव्या दिवशी मनाची तयारी करून सेमी इंग्रजीच्या 'अ' तुकडीत जाऊन बसलो.

हायस्कूल सुरू होऊन चार ते पाच दिवस झाल्यामुळे प्रत्येक वर्गाच्या वर्गशिक्षकांनी त्यांच्या वर्गाचा हजेरी पट निश्चित केला होता. आमच्या गावाकडे एक पद्धत आहे की, सुरूवातीची तासिका ही नेहमी वर्गशिक्षकाची असते. त्यानुसार सकाळी पहिली तासिका ही इंग्रजी शिकवणारे श्री. युवराज वसंतराव कांबळे यांची होती. सकाळी वर्गात आल्यानंतर त्यांनी हजेरी घ्यायला सुरूवात केली. हजेरी घेऊन झाल्यावर शेवटी विचारले कोणाची हजेरी घ्यायची बाकी आहे का? आणि राहिली असेल तर उभे रहा, वाघाच्या डरकाळीने भित्र्या हरणाची अवस्था होते अगदी तशी माझी अवस्था झाली होती. त्यात भर म्हणजे या अभ्यासक्रमाची भीती. मी उभा राहिल्यानंतर सरांनी त्यांच्या कर्नाटकी भाषेच्या लयीत एक प्रश्न विचारला; "काय साहेब चार दिवस कुठे होतात?" सर मी

चार दिवस 'ब' तुकडीत बसलो होतो" मी उत्तरलो. त्यांनी पुढील प्रश्न केला, 'का? मी म्हणालो,"मला या वर्गात बोलावण्यात आले नव्हते. त्यावेळी माझा गैरसमज होता की, सेमी इंग्रजीच्या विद्यार्थ्यांना यादी प्रमाणे बोलावण्यात येईल." त्यावर सर रोखून म्हणाले, "तुला या वर्गात बोलवायला तु काय व्हीआयपी आहेस का? मी इथे व्हीआयपी हा शब्द नसाच्य वापरत आहे, कारण त्यांनी या शब्दावर असा जोर दिला होता की संपुर्ण वर्गात हास्यकल्लोळ उडाला होता. पण मी मात्र खजील होऊन मान खाली घातली होती. सरांनी मला विचारले, "तू सेमी इंग्रजी का घेतलेस? सांगू शकशील का?" त्यांच्या या प्रश्नावर मी काहीच उत्तर दिले नाही. त्यांनी पुढील प्रश्न केला, "तुला माहित आहे का? कोणते विषय तुला इंग्रजीतून अभ्यासायचे आहेत."


मी घाबरत म्हटलं, "हो, गणित आणि विज्ञान हे विषय इंग्रजीतून अभ्यासायचे आहेत!" क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी मला पुढचा प्रश्न विचारला, या प्रश्नाची तीव्रता आणि रोख एवढा गंभीर होते की माझ्या अंगावर काटा उभा राहिला. सरांनी मला विचारले की, "तुला या विषयांच्या नावाची स्पेलिंग तरी येते का?" त्यांच्या या प्रश्नाने माझ्या मनात कालवाकालव करायला सुरुवात केली. मी त्या प्रश्नाचे उत्तर दिले.


३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

पण त्यानंतर माझी मलाच लाज वाटू लागली. माझ्या मनाला तो प्रश्न सतत टोचत होता. मला मान्य आहे की मी मराठी माध्यमाच्या एका सामान्य शाळेत मराठीतून शिक्षण घेतले, परंतु याचा अर्थ असा नाही की, समोरच्या व्यक्तीने मला तुच्छ लेखावे. याची मला खंत वाटली. मग मनाशी एक निश्चय केला की आता काहीतरी करून दाखवण्याची वेळ आली आहे. आणि तेव्हापासून सुरूवात केली ती दहावीच्या निकालापर्यंत त्यावर्षी हायस्कूलमध्ये मी प्रथम क्रमांकाने पास झालो. त्यावेळी मला ९४.३०% गुण मिळाले. त्यातच भर म्हणजे त्यावर्षी इंग्रजी, विज्ञान आणि गणित या विषयांमध्ये प्रथम येणारा विदयार्थी सुद्धा मीच होतो. असा हा माझ्या आठवणीतला सुंदर क्षण होता. आणि आजही त्या प्रसंगाची जाणीव आणि तीव्रता तशीच माझ्या मनात रुतली आहे, अगदी खोलवर .......




29-4-19

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

# त्या दिवशी पाऊस होता.

प्रसंग तर खूप घडतात पण आठवणीत ठेवण्यासारखे खूप कमी घडतात. तसाच एक प्रसंग मी आपल्या सर्वांना सांगू इच्छितो. दिनांक २९ ऑगस्ट २०१७ रोजी खूप पाऊस होता. तेव्हा मी एस. आई. ई. एस महाविद्यालयात शिकत होतो. माझे बारावीचे वर्ष होते. मी त्या भरपावसात घराबाहेर कॉलेजकरता निघालो. मला वाटलं की इतकं काही होणार नाही, पण खूप काही झालं मी जसा कॉलेजमध्ये पोहचलो तशी कॉलेजमधली लॉंग बेल वाजली. आणि माझ्या पायाखालची जमीनचं सरकली. कारण तो संदेश म्हणजे कॉलेज बंद होण्याची घंटा होती. माझं असं म्हणण्याचं कारण. तो संकेत कॉलेज बंद व्हायची घंटा होती. आणि मी घरच्यांशी विरोधात कॉलेजला जाण्यासाठी घराबाहेर पडलो होतो. तरीही हिम्मत न हरता मी वरच्या मजल्यावर गेलो. आणि पाहिलं तर, माझे सर्व मित्र घरी जाण्यासाठी निघाले होते. आणि मी चिंतेत पडलो. त्यातल्या एका मित्राचे घर जवळचं होते. मग माझ्या दोन मित्रांनी आणि मी ठरवलं की आम्ही त्याच्या घरी जाऊन नंतर तीन-चार च्या सुमारास आपापल्या घरी निघुन जाऊ. त्याच्या घरी गेल्यावरही आम्हाला खूप काही तिखट बोल ऐकावे लागले. असं वाटलं होत की आम्ही इथं का आलो? घरी गेलो असतो.

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

तर बरं झालं असतं पण नाही आम्ही तिथून
निघालो नाही. कारण माझे तीन मित्र आणि मी
ज्या मित्रांच्या घरी थांबलो आहे त्याच्या घरी
त्याच्या घरी कार्यक्रमाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी
त्याचे काही मित्र येणार होते. हे माझे तीन मित्र
अगदी जीवाला-जीव देणारे होते. मी त्यांना
म्हणालो देखील घरी जा खूप पाऊस आहे.
पण त्यांनी माझं एक न ऐकला मला म्हणाले की,
तु शांत बस जो होगा देखा जायेगा। आता
जर निघालोच आहोत तर येऊच - हार नाही
मानायची. पण खरं तर जे लोक माझ्यासाठी
त्यांच्या घरी येणार होते. पण ते आत येवू
शकत नव्हते कारण पावसामुळे ट्रेन बंद होत्या.
आणि माझे मित्र मला म्हणाले होते. की आम्ही
तुझ्यासाठी थांबलो. नाहीतर ट्रेनमध्येच रात्र
काढावी लागली असती. त्यांची ट्रेन तब्बल
६ तास कुर्ला ते सायनमध्ये अडकली होती.
ते पाऊस खूप एन्जॉय करत होते. आणि मला
इथे चिंता लागली होती की ते इथे कधी येणार
आणि ते लोक सातच्या सुमारास आले.
आमच्या जीवात-जीव आला. त्यातल्या एकाचे
पूर्ण कपडे भिजले होते. त्यानंतर आम्ही जेवलो
व आमची झोपायची तयारी सुरू झाली.
मग आम्ही पुन्हा तिथून निघायचं ठरवलं पण
आमच्या मित्राच्या घरच्यांनी आम्हाला जाऊ दिले
नाही. त्यात आमची रात्र खूप मजेत गेली.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

आम्हाला खूप थंडी वाजत होती. आणि त्यात रूम मध्ये AC लावली होती. अशी आम्ही सहा जणांनी रात्र कुडकुडतच काढली. बरोबर सकाळी सात वाजता आम्हाला उठवले गेले आणि घरी जाण्यासाठी सांगितले गेले. आम्ही कसलाही विचार न करता तिथून निघालो कारण पाऊस पूर्णपणे थांबला होता. त्याच्या बिल्डिंग खाली येऊन कानाला खडा लावला की इथे पुन्हा पाऊलही ठेवायचे नाही. आणि पाऊस जास्त पडल्यास घराबाहेर पडायचे नाही.

आजही जोरात पाऊस आल्यावर धडकी भरते. आणि ती रात्र आठवते.



३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

# उठा, लोकांनो लढा.

उठा लोकांनो लढा
तुम्ही उठा आणि लढा
अन्यायाच्या जोखडातूनी 'माणूस' बाहेर काढा. ॥१॥


सशक्त भारतभूची लेकरे, तुमच्यावरती गर्व असे.
नारी रक्षणा ठेवा तयारी, भाऊ तुमच्या महात्मा दिसे.
उभे रहा रे निराशाच्या पाठी, ममतेचा तो आहे मळा ॥२॥

दूर सारली नाती-जाती, बंधुभाव तुम्ही जपा जरा.
भेदूनी अन्यायाची भिंती, शांतीदिप तो लावा खरा
ईश्वर, अल्ला एकच आहे. एकच त्याची शाळा ॥३॥

जबाबदारी तुमची आहे. आतंकाशी लढण्याची
जबाबदारी संस्कारांचीही आहे. लढता-लढता हारण्याची
तुम्ही एकटे नाही सगळे मिळून सोसू त्या कळा ॥४॥

माझे मी पण, तुझे तू पण सोडून या जवळ जरा
समतेचा हा नारा आपण पोहचवू घरा घरा
प्रण आज हा मनी धरा, सारे लढा रे एक बळा ॥५॥

आक्सा खान



क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

## शाळेची सहल

प्रत्येकाच्या आयुष्यात कुठला ना कुठला अविस्मरणीय दिवस असतोच. असाच माझा आयुष्यातला तो दिवस मी कधीच विसरू शकत नाही.

दरवर्षी प्रमाणे यंदाही आमच्या शाळेची सहल गेली होती. सहल जाण्याच्या विषयी एक आठवडा अगोदर आमच्या गुरुजींनी आम्हा सर्व मुलांना सहली विषयी सांगितले. सहलीचे ठिकाण होते वॉटर पार्क. आपल्या शाळेची सहल जाणार हे ऐकून आम्हा सर्व मुलांना खूप आनंद झाला.

सहलीचा विषय काढल्याच्या दुसऱ्या दिवसापासून वर्गात सहली विषयीची चर्चा सुरू झाली. कोणताही मुलगा किंवा मुली शिक्षकांच्या शिकवण्याकडे लक्ष देत नव्हते. प्रत्येकाची आपापसात सहलीविषयीची कुजबूज चालू असते.

'आपण तेथे गेल्यावर खूप मज्जा करायची, पकडापकडी खेळायचे," अशाप्रकार काही वाक्ये प्रत्येकाच्या मनामध्ये चालू असत. बघता बघता दिवसामागून दिवस गेले. सहल जाण्याची तारीख होती १५ जुलै. अखेर सहलीचा दिवस उजाडला. शिक्षकांनी सांगितलेल्या वेळेप्रमाणे आम्ही सर्व मित्र - मैत्रिणी शाळेचा गणवेश घालून ठीक सकाळी ७.०० वाजता शाळेत जमलो. प्रत्येक मुलाच्या

चेहऱ्यावर आनंद दिसत होता. शाळेच्या आवारात प्रथम पालकांची गरदी झाली होती. शाळेच्या आवारात तीन मोठ्या लक्झरी बसेस उभ्या राहिलया होत्या. व प्रत्येक पालक आपलया बिन ओळखीच्या पालकांशी सहलीविषयी विचारपूस करत होते.

सर्व शिक्षकांनी आम्हाला शिस्तीचं पालन करण्यास सांगितले. तसेच आपल्या शाळेचे नाव खराब होईल, अशी कोणतीही गैरवर्तणूक न करण्यास बजावले व त्यानंतर हजेरी घेण्यात आली. सहल असल्यामुळे कोणताही मुलगा किंवा मुलगी गैरहजर नव्हती. ठीक ५.०० वाजता बस वॉटर पार्कला जाण्यास निघाली. गाडी सुरू होताच सर्व मुलांनी " गणपती बाप्पा मोरया " असा आवाज दिला व अखेर आम्ही वॉटर पार्कला जाण्यास निघालो. बसमध्ये आम्ही गाण्याच्या भेंड्या, नाचणे, एकमेकांना चिडवणे या सर्व गोष्टी चालू होत्या. १ ते २ तासांच्या प्रवासानंतर अखेर आम्ही शांती सागर वॉटर पार्कला पोहचलो. व वॉटर पार्क पाहून सर्व मुले व मुली आनंदी होत्या.


पाण्यामध्ये उतरलया नंतर सर्व मुले पाण्यात खेळू लागले. व प्रत्येकाचे मन एकदम प्रसन्न झाले. पाण्यातून बाहेर आलया नंतर आम्ही सर्व मित्र-मैत्रिणी जेवण करायला गेलो. जेवण झाल्यानंतर आम्ही पुन्हा पाण्यात गेलो व तिथे

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

आम्ही खूप सारे छायाचित्रे काढले व खूप काही गोष्टी केलया. व संध्याकाळी ६.०० वाजता परत घरी जाण्यास निघालो व प्रत्येकजण रांगेमध्ये उभा राहून आपआपलया बसमध्ये चढले. व घरी जाताना गुरुजींनी प्रत्येकाला प्रश्न विचारले की कशी वाटली सहल व मजजा आली का? तेव्हा सर्व मुले खूप चांगलया प्रकारे उत्तर देत होती. व गुरुजींनी आपण दरवर्षी वेगवेगळया ठिकाणी सहलीला जायचे. त्यानंतर शाळेच्या गेट समोर बस उभी राहिली. व गुरुजींनी परत एकदा हजेरी घेतली व प्रत्येकजण आपआपल्या घरी गेले. व प्रत्येकांच्या घरी गुरुजींनी फोन करून विचारले की मुले घरी आले का?

अशा अनेक गोष्टी ह्या आम्ही सहलीमध्ये केलया होत्या व तो दिवस अजूनही आम्हाला आठवतो.

असाच माझ्या आयुष्यातला सहलीच्या दिवस मी कधीहि विसरू शकणार नाही. व माझ्या आयुष्यातला हा एक अविस्मरणीय क्षण होता.



३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

# आम्ही दोघी

काही क्षण आपल्या आयुष्यात असे असतात की ते आपल्याला कधीच विसरता येत नाहीत. माझ्या आयुष्यात सुद्धा काही क्षण असे होते की ते मला नेहमी लक्षात रहातात. जीवन हा शब्द किती लहान वाटतो पण यात खूप काही सामावले आहे. काही क्षणातच इतक सुख येतं की दुःखाचे शिखर पाडून टाकते आणि काही क्षणातच इतकं दुःख येतं की समुद्रात सुनामी आल्यागत वाटत. जीवन हे असच असतं माझ्या मते जीवन हे एक पुस्तक आहे. पुस्तकाची पाने दररोज उलटली जातात त्याप्रमाणे आपल्या जीवनाची पाने सुद्धा उलटली जातात. प्रत्येक क्षण एक सारखा नसतो.

माझ्या आठवणीतील काही क्षण खूपच गोड होते तर काही क्षण दुःखदायक होते. माझी एक मैत्रीण होती तिचे नाव सावित्री होते. मी खूपच लहान होते तेव्हा तिच्याशी माझी मैत्री झाली. मी सहा वर्षाची होते ती सुदद्या माझ्याच वयाची होती. आम्ही होस्टेल मध्ये रहत होतो. ती तिच्याबद्दल मला सगळ काही सांगायची. आम्ही आठवी मध्ये गेलो तेव्हा तिने मला बरच काही

मराठी मंडळ

सांगितल. तिला तीन बहिणी होत्या. वडिलांची इच्छा होती की मुलगा झाला पाहिजे पण तिच्या आईने मुलींना जन्म दिला. तिच्या वडिलांना भरपूर राग आला. त्यांनी दुसरं लग्न केल आणि दुसऱ्या बाईला सुद्धा मुलगी झाली. सावित्रीचे वडील त्यांना खूप मारायचे आणि त्यांना मुली अजिबात आवडायच्या नाहीत. सावित्री आमच्या वर्गातील प्रथम क्रमांक काढणारी मुलगी होती. ती कधीच दुसरा नंबर न घेता नेहमी वर्गात प्रथम क्रमांक काढायची. तिच्या वडिलांना तिच्याबद्दल काहीच वाटायचे नाही. ते तिला नेहमी घाणेरड्या शिव्या दयायचे. ती नेहमी रडायची. सुट्टी असली तरी ती घरी जायची नाही कारण तिचे वडील खूपच वाईट होते असे ती म्हणायची. तिचे वडील नेहमी दारू प्यायचे. तिची आई घरकाम करायची. तिला सुदृधा तिचे वडील खूपच शिव्या दयायचे. तिची आई घर चालवायची घरची कर्ती आई होती परंतु पूर्ण सत्ता वडिलांच्या हातात होती.

मी एकदा सावित्रीच्या घरी गेले. एक झोपडंच त्याला म्हणता येईल. खूपच लहान जागा. परंतु तिच्या आईने ते घर नीट नेटके

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

लावलेले होते. पावसाळ्याचे दिवस होते. पाऊस पडत होता. घरात छिद्र होते म्हणून पावसाचे पाणी घरात येत होते. तिची मोठी बहीण भांड्याने ते पाणी काढत होती. चार माणसांना मांडी घालून बसता येणार इतकीच जागा होती तिच्या घरात. ते पाहुन मला खूपच वाईट वाटलं. अगदी ते घर तळ्यासारखं दिसत होतं. मी तिच्या लहान बहिणीला विचारलं "तुझं काय स्वप्न आहे?" तिने उत्तर दिलं आमच्या सारख्या गरिबांना दोन वेळेचे जेवण मिळत नाही तर स्वप्न पाहणे ही खूपच दूरची गोष्ट आहे. तिचे उत्तर ऐकून अंगाला काटे आले.

जीवनाचा डोंगर चढताना
दुःखाचा समुद्र ओलांडून
अपेक्षांच्या पायऱ्यांवर उभे राहून
शिखर गाठण्यासाठी धडपडणारी मी
जाईन का तेथपर्यंत की कोसळेल
माझ्या स्वप्नाची भिंत अर्ध्या वाटेवर...

ही ओळ नेहमी बोलायची सावित्री. खरच ती खूपच चांगली होती. तिचे खूप स्वप्न होते आणि त्या स्वप्नांना पूर्ण करण्याची इच्छा, धमक तिच्यात होती. तिला खूप उंच उडायचे होते. परंतु मला कधीच असे वाटले नव्हते की तिच्या पंखाला कोणी कापणार आहे.

नशिबाने साथ दिली नाही. तिच्या वडिलांनी सांगितले हिचे लग्न करूया. ती तेव्हा आठवीत होती. वडील बोलले, "जर तू लग्न करणार नाहीस तर तुझ्या लहान बहिणीचं लग्न करेन मी" आणि तिची आई सुद्धा खूपच आजारी होती. आईने सांगितल वडिल बोलतात ते ऐक. तिने घरात खूपच भांडण केल. पण आईसाठी तिने स्वतः च्या स्वप्नांना थांबवल. स्वप्नांचा गळा गोठला. मी आठवीमध्ये असताना मे-च्या सुट्टीत तिचे लग्न झाले. मला अतिशय दुःख होत होते. पण मी काही करू शकत नव्हते. ती मला नेहमी म्हणायची, "तुझी आणि माझी स्थिती सारखी आहे. तुला आई-वडिल नाहीत. आणि मला आई-वडिल असून ते कधीच माझं ऐकून घेत नाहीत. ते असून पण नसल्यागत आहेत." तिचे लग्न झाले. सगळे शिक्षक तिचे नाव काढायचे. मला पण वर्गात खूपच एकटे एकटे वाटायचे. मला असे वाटायचे आई-वडिल खूपच महत्त्वाचे असतात, आपल्या जीवनात, पण नंतर माहित झाल काही आई-वडिल आपल्याला मुलगी झाली म्हणजे संकट आलं अस समजून लवकर या संकटाशी आपली कशी सुटका होईल हे पाहत असतात. माझ्या मनात त्या वेळेस भरपूर येत होते. जन्माच्या आधीच त्यांची हत्या का केली जाते? मुलींना जन्माचा अधिकार आहे की नाही? मुलींना

का कमी समजले जाते? त्यांच्या इच्छा आकांक्षा का जपल्या जात नाहीत? मुलगी झाली म्हणजे गरिबी आली असे का लोक समजतात? हे सुंदर जग बघण्यासाठी आधी त्यांची हत्या का केली जाते?

माझ्या जीवनात असे काही क्षण मी कधीच विसरू शकणार नाही. आता पण ते क्षण आठवले तर अंगावर काटे येतात. लहान वयातच मुलीवर बलात्कार केला जातो. आणि जो अपराध करतो त्याला काहीच शिक्षा मिळत नाही. पण त्या मुलीचे जगणे कठीण केले जाते. हे सगळे क्षण आठवल्यावर असे वाटते की काही तरी केले पाहिजे. आपण पाऊल उचलले पाहिजे.





Parshuram
10-02-2019

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

# 'ती'

ती दिसते ती मला रोज दिसते.
तिच्या मनात साठलेले मला
नैराश्य जाणवले.
ती वेळ आली होती.
तिच्या आयुष्यात फक्त काही क्षणांपुरतीच.
पण देऊन गेली वेदना जन्मभराची

निराधार क्षणी त्या असुराने घेतला होता,
तिच्या शरीराचा भोग,
तिच्या त्या देहावर,
देऊन गेला तोच जखमा अनेक,
फक्त तिच्या देहावर नाही तर,
तिच्या कोवळ्या मनावरही,
करून गेला तो अत्याचार

ती दिसते,
आजही दिसते,
तशीच घाबरलेली,
मनातून हरवलेली,
स्वतातच गुंतलेली,

३० जुलै २०१९.
अंक पहिला

क. जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

# आशय मराठमोळं नियतकालिक

काल जे घडले तिच्यासोबत
ते आज कोणासोबत तरी घडत असेल.
थांबण्यासाठी हे वेदनांचे रथचक्र
ती होईल पुढाकार
सामोरे जाई ह्या जगाला.
आपले घाबरणे, वेदना विसरुन.

तेव्हा ती दिसेल
मनी नवी उमेद असलेली,
चेहऱ्यावर नवा इशारा असलेली 'ती'

कवी - परशुराम गावडे.



३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

# बाबा

लहान असल्यापासून आई मुलांना सांगत असते. इथे नको जाऊ बाबा मारेल, तिथे नको जाऊ बाबा मारेल. झाडावर चढू नको बाबा मारेल, नदीवर जाऊ नको जाऊ बाबा मारेल. शाळेत जा नाहीतर बाबा मारेल. हे करू नको नाहीतर बाबा मारेल, ते करू नको नाहीतर बाबा मारेल.

मग मुलसुद्धा बाबांना घाबरतात. बाबांच्या भयानं शाळेत जातात. बाबांनी मारू नये म्हणून अभ्यास करतात. बाबांच्या दहशतीखाली शिकत राहतात. हळूहळू मुलं बाबांकडे दुर्लक्ष करून आईवरच प्रेम करू लागतात. मनामधून बाबांना काढून टाकतात आणि आईच्या चरणावरती सर्वस्व अर्पण करतात.

मुलं आईचं गाणं गातात, मुलं आईवरचं कविता करतात. बाबांपासून चार हात लांबच राहतात. कोणतच मुल बाबाला दुधावरची साय म्हणत नाही, लंगड्याच्या पाय म्हणत नाही, वासराची गाय म्हणत नाहीत. बाबांसाठी मुलांकडे शब्दच नसतात. मुलाच्या पायाला ठेच लागली तरी मुल बापरे म्हणत नाहीत. आणि साने गुरुजींनाही श्यामचा बाप दिसत नाही.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

आई घरात असली की घर कसं भरल्यासारखं वाटत. पण बाबा घरात असले की मात्र स्मशान शांतता. मुलं शपथ सुद्धा आईचीच घेतात. बाबा शपथेच्याही लायकीचा नसतो. बाबा असतो केवळ मुलांच्या नावाच्या आणि आडनावाच्या मध्ये नावापुरता....

बाबा म्हणजे केवळ रुपये पैसे कमविण्याचे यंत्र. तेवढं काम त्याने केलं की त्याचं कर्तृत्व संपल. मुलं विठोबाला माऊली म्हणतात, धरणीला माय म्हणतात आणि देशाला माता म्हणतात. बाबा मात्र धरणीतून, देशातून आणि मुलांच्या मनातून केव्हाच झालेला असतो हद्दपार....

बाबा असतो कठोर, काळीज नसलेला, निर्दयी, मारकुटा. बाबा असतो मुलांच्या स्वप्नात येणारा बागुलबुवा. पण मग असं असूनही बाबा मेल्यावर मुलांच्या मनात धडकी का भरते? का ओघळतो मुलांच्या डोळ्यातून पाऊस? का वाटतं मुलांना आपल्या पायाखालची जमीन सरकल्यासारखी. का वाटतं मुलांना की आपण बेसाहारा झालोय म्हणून. का घाबरतात मुलं बाबा मेल्यावर, का घाबरतात मुलं बाबा गेल्यावर. कथा, कादंबऱ्या आणि कविता यांमध्ये कधीही नसणारा हा कठोर हृदयाचा बाबा प्रत्यक्षात नसतो अथवा नसलेला होतो तेव्हा का वाटतं मुलांना की,

३० जुलै २०१९.


अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

# आशय

मराठमोळं नियतकालिक

जी डोळे मिटून प्रेम करते तीला प्रेयसी म्हणतात,
डोळे उघडे ठेवून जी प्रेम करते तीला मैत्री म्हणतात,
डोळे वटारून जी प्रेम करते तीला पत्नी म्हणतात,
आणि स्वतःचे डोळे मिटेपर्यंत जी प्रेम करते
तीला आई म्हणतात. पण डोळ्यात प्रेम न
दाखवता जो प्रेम करतो त्याला बाबा म्हणतात.



३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

# आई

शोधत होते माझा जीवलग मित्र,
डोळ्यासमोर आले माझ्या आईचे चित्र।

कुशीत घेऊन मला ती झोपी जाई.
म्हणत म्हणत अंगाई, ये गं गोठ्यात गाई गाई।

बोला नेहमी खरं हिचं होती शिकवणं
हृदयात धरून ठेवली तिच्याशी जुळलेली प्रत्येक आठवण।

वृक्ष जसा उन्हात राहूनी सर्वांना देते सावली
तसे मनी दुःख झेलूनी सुख देते माऊली ।

जन्म दिलास तू दिला जीवनाला आकार
तुझ्याच हातात धरून माझी स्वप्न करणार साकार

गुंतलेले तुझे हात नेहमी असतात कामात
तुझी अंगाई ऐकण्यास चंद्र होऊन येई रात।

स्वप्न एक ठरावे खरे पुढच्या जन्मी मिळावी पुण्याई,
तुझ्याच पोटी यावा जन्म हीच आस मोठी आई।

माया, ममता भरूनी जीव लावते आई
नाही जगात कोठे, अशी तुझी ममताई।

आफ्सा खान

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

## माझा एन.एस.एस. कॅम्प

आठवण ही संकल्पनाच मुळी विचित्र आहे. खरं म्हणजे ही संकल्पना नाही. एक भावना आहे, मानवी मनाची. आपल्या मनामध्ये अनेक आठवणी असतात. आठवणी या अळवावरच्या पाण्यासारख्या नसतात. म्हणजेच फार काळ टिकणाऱ्या असतात. त्या आपल्या मनाच्या गाभाऱ्यात बंद असतात. त्या जेव्हाच बाहेर येतात तेव्हा भावनांचा पूर मनाच्या गाभाऱ्याचे दरवाजे खोलतो. असाच एखादा क्षण माझ्या आठवणीच्या गाभाऱ्यात बंद आहे.

डिसेंबरचा महिना होता. आमच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कॅम्प डहाणूला गेला होता. आम्ही सर्व विद्यार्थी त्या ठिकाणी सात दिवसांसाठी गेलो होतो. २७ डिसेंबरची रात्र होती. कॅम्पची शेवटून तिसरी रात्र. त्या रात्री माझी तब्येत बिघडली. ताप आला होता, भरभरून. जसजशी रात्र पुढे जात होती तसतसा ताप जास्त वाढत होता. त्यावेळी माझ्या मित्रांनी मला आराम करायला सांगितलं. माझ्या वाटणीची कामे केली. रात्रभर माझी काळजी घेतली. माझ्यासाठी जास्तीचे पांघरूण, औषधे, गरम पाणी यांची सोय त्यांनी केली.

३० जुलै २०१९.
अंक पहिला
क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

सर्वजण रात्रभर माझ्याभोवती बसून माझी
काळजी करत होते. कोणाला हा क्षण
सांगितला तर तो आठवणीतला क्षण वाटणार
नाही. त्यावेळी जरी मी आजारी असलो,
तरी मला सर्व सत्य माझ्या डोळ्यांनी दिसत
होते. ही मुले जी वर्षभर एकमेकांसोबत
भांडत होती. वाद घालत होती. एकमेकांचे
चेहरेही त्यांना बघवत नव्हते. अशी
परिस्थिती नव्हती. ते ज्या कॅम्प मध्ये आले
होते तिथेही त्यांचे वाद व भांडणे चालायची.
इथेही त्यांचे वाद थांबले नाहीत. एकमेकांचे
काम करण्यात पण ते मदत करत नसत
इतकी वाईट परिस्थिती होती. पण त्या रात्री ती
परिस्थिती बदलली मी जेव्हा आजारी पडलो.
तर ग्रामस्थलला जो विद्यार्थी प्रमुख होता.
त्याने मला आराम करायला सांगितले.
व बाकी सर्वांना सांगितले की तुमच्या
गटातील एक पण आजारी पडला की त्याची
काळजी घेणे ही तुमची जबाबदारी आहे.
त्याची कामे व त्याच्या तब्येतीवर लक्ष ठेवणे.
त्यालाही वाटले नव्हते की सर्वजन असे
वागतील सर्वकाही सुयोग्य निभावून जाईल.
प्रत्येकजण आपापले वाद विसरून
काम व माझी काळजी करत होते.

कुणी पाण्याच्या पट्या डोक्यावर ठेवत होत.
तर कोणी गरम पाणी देवून येत होत.
त्या दिवशी त्यांच्यातला प्रत्येक एक सुनियोजित
तुकडीप्रमाणे काम करत होता. त्या दिवशी
आकाशदर्शनाचा कार्यक्रम होता. त्यावेळी
काहीजण आकाशप्रदर्शनाला न जाता माझी
काळजी घेत माझ्यासोबत थांबले होते.
त्यावेळी असे वाटले की भलेही बाहेर
लाखोंच्या हातात चांदण्या असतील पण
आकाशातले खरे तारे माझ्या सोबत माझी
काळजी घेत होते. तब्येत सुधारली थोडी तरी
त्यांनी मला कोणतही काम करू दिल नाही.
केली तर आमच्या सगळ्यांची कामे तू
करायची असे मला बजावून सांगितले.
आज भलेही त्यांच्यामध्ये पुन्हा वाद होत असतील
तरी ते एकमेकांच्या मदतीला नक्की धावून
येणार आमच्या सरांनी एकदा सांगितले
होते. राष्ट्रीय सेवा योजना एक परिवार आहे.
त्या दिवशी त्या वाक्यातील खरेपण
दिसले त्यादिवशी सर्वजण मैत्रीच्या पुढे
जाऊन एका परिवाराप्रमाणे वागले.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

# तुफान आलंया

कसला दुष्काळ? कसला पाण्याचा तुटवडा? असे अनेक प्रश्न अनेकांच्या तोंडून ऐकले. आणि त्याचं खरं रूप इथे आल्यावर कळालं गेले तीन दिवस मराठवाड्यात राहिल्यावर खऱ्या अर्थाने पाण्याचं महत्व कळू लागलं पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं महत्व इथल्या लोकांकडे पाहून कळलंय श्रमदान करण्याच्या हेतूने आलेलो मी इथली परिस्थिती पाहून काही वेळासाठी मीच विचारांनी श्रमील झालो. कशी इथली लोकं इथे राहतात. कसं जीवनं चालू आहे त्यात ह्यांना रोज पाणी मिळतं असेल की नाही? खरंतर मुंबईच्या आसपास राहणाऱ्या पुरवादश्या ओळखीला असं वातावरण मानवणं थोडं अवघड आहे. तर ११ तारखेला अचानक माझ्या मित्रांसोबत अंबेजोगाई येथील ज्ञानप्रबोधिनी संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या श्रमदानाला मदतीचा हात देण्यासाठी मी इथे आलो.

इथे आल्यानंतर अंबेजोगाईमध्ये पाऊल ठेवल्या-ठेवल्या पाण्याचा थेंब पोटात जावा अशी इच्छा झाली, पण उतरलो आणि पाहतो काय? पिण्याच्या पाण्याचे ट्रक... भरून आंबेजोगाईमध्ये,

३० जुलै २०१९.


अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

# आशय

मराठमोळं नियतकालिक.

ज्ञानप्रबोधिनीच्या कार्यक्षेत्रात आलो. येथील आंबेजोगाई केंद्राचे प्रमुख प्रसाद दादा चिक्षे ह्यांच्याशी परिचय झाला. अत्यंत ज्ञानी हुशार आणि समाजात वावरणारी आणि समाजाचं भान असलेली व्यक्ती. त्यांच्या मार्गदर्शनानुसार थोडं काम शिकलो आणि लागलो मदतीला.



पहिल्या दिवशी भालाशिरपुरा गावात श्रमदान केलं. सामान्य व्यक्तीच्या मतानुसार श्रमदान करणं म्हणजे आपले श्रम आपली मेहनत केल्यावर कळलं की इथल्या लोकांना त्याची किती गरज आहे. नंतर आनंदवाडी, पांगुळगव्हाण आणि मांडवखेळ अशा गावांमध्ये भेट आणि थोडफार श्रमदान केलं. कालच्या दिवशी अरज-वाडी येथे ग्रामसभेचा अनुभव घेतला. तिथली लोकांची एकी आणि आपलं गावं कसं पाणीदार व्हावं ह्याबद्दलची त्यांची असलेली भावना ह्याचा अनुभव मिळाला. खरंतर माझ्यासाठी हे सगळं नवीन होतं. तर ते पाहून खरोखर उत्साह रोमारोमात भिनला. हाच उत्साह आपण आपल्या प्रत्येकामध्ये जागवूयात आणि निदान आपले दोन दिवस त्या कामासाठी देऊयात. मग बघा आपला मराठवाड्यातील बळीराजा कसा समृद्ध होतोय ते.



३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.


आशय मराठमोळं नियतकालिक

# जाणवले मला...

तो वर्णाने काळा होता इतरांपेक्षा वेगळा ही. त्याच्याशी मी नेहमी बोलत असे. त्याचा आवाज अगदी त्याच्या वर्णाला न शोभणारा असाच होता. अर्थात खूप सुंदर आणि भारी तो खूप उत्तम गायचा कोणी 'गा' म्हटलं की तो लगेच तयारच असे. मला त्याच्या आवाजाचं फार कौतुक वाटायचं. त्याचं गाऊन झालं की सारे जण त्याचे कौतुक करायचे. त्याचा स्वभाव कसा होता किंवा तो माणूस म्हणून कसा होता. हे मला माहित नाही. आणि ते माहित करून घ्यायची कधी गरजही वाटली नाही. तो त्याच्या जवळच्या मित्रांसोबत नेहमी असे. त्याला त्यांचा खूप लगाव होता. आणि त्यांनाही त्याचा. त्याचा आवाज किती सुंदर आहे. हे मला त्याच्याशी फोनवर बोलताना कळलं त्याचा आवाज प्रत्यक्षा पेक्षा फोनवरच जास्त सुंदर वाटे. त्याला कुठेही जायचं असल्यास मी त्याला व त्याच्या मित्रांना (दोन) त्या ठिकाणी होवून जात. मी त्याच्या व त्याच्या मित्रांसोबत कायमचं राहू लागले. अशा प्रकारची जवळीक त्यांची अनेक मुलांशी व मुलींशी असे. काही काळाने आम्ही खूप चांगले मित्र झालो.

३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.




आमचं अनेक विषयांवर खूप बोलनं होत असे. अभ्यासा व्यतिरिक्त अनेक विषय आम्ही चर्चेच्या संदर्भात हाताळत असू. कदाचित तो अशा विषयांवर माझ्याशीच बोलत असावा. असे मला कालांतराने वाटू लागले. कदाचित ते तसेच असावेही त्याचे नाव ही विलक्षण सुंदर होते. मला ते फार आवडायचे - शौनक. तर त्याच्या दोन्ही मित्रांची नाव साहिल आणि राहूल होती. तो एकदा अशाच एका विषयावर माझ्याशी बोलायला लागला. त्याच ठिकाणी त्याचे मित्रही होते. त्यांचं आमच्यापासुन दूर काहीतरी चालू होतं. त्यांचा आमच्या चर्चेत सहभाग नव्हता. म्हणजेच ते आमच्यात सहभागी नव्हते. मग त्याने मला प्रश्न विचारायला सुरुवात केली. तो म्हणाला. अबोली एकविचारू, राग तर येणार नाही ना?" मी विचार न करताच म्हणाले," ~~मी विचार~~ तेव्हा तो म्हणाला," तुम्ही आमच्यासारख्या मुलांकडे असे वेगळे म्हणून का पाहता. मी म्हटलं," म्हणजे?" तेव्हा तो म्हणाला," म्हणजे आमच्यासारखी अंध मुलं तुम्हाला ते सुख देऊ शकत नाहीत का? जे सुख तुम्हाला नॉर्मल मुलं देऊ शकतात. ते आम्ही देऊ शकत नाही. मला त्याच्या प्रश्नाच्या काहीच अंदाज येत नव्हता. व उत्तरादाखल त्याची.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

काही समजुतही काढता येत नव्हती. मी त्या क्षणी हलबल झाले. मी त्याच्या समाधानाखातर म्हणाले, " जाही असं काही नसतं."
तेव्हा त्याने माझ्यावर पुन्हा प्रश्नांचा भडिमार सुरु केला. व त्याच्या पुढच्या प्रश्नांनी मला आणिक भांडावून सोडलं तो म्हणाला, " तुला जर अशा पृथ्वादच्या (अंध) मुलाने प्रपोज केलं असत तर तू काय केलं असतंस" मला कळत नव्हतं त्याचे हे प्रश्नं मलाच का ? मला काहीच समजेना. मी विचारात पडले. पण उत्तर मिळेना मलाही काहीच बोलता येत नव्हत. असं काय केलं असतं मी? तेव्हा तो म्हणाला, " सांगना... तेव्हा मी म्हणाले की मी नक्कीच नकार दिला असता. तेव्हा त्याने "का?" हा प्रश्न विचारलाच मी म्हणाले की " माझं मन इतकं मोठं नाही. की मी पृथ्वादच्या अंध मुलावर प्रेम करेन. मी कधी असा विचारही केला नाही. अशा प्रकारची उत्तर त्याला दिली. त्याने त्याचे समाधान झाले नाही. पण काही काळ त्याच्या प्रश्नांनी मला खूप विचारात पाडलं मला कळेना त्याला या प्रश्नांतून काय उत्तर अपेक्षीत आहे. आणि तेही माझ्याकडूनच "का"? त्याची कथी बाराखडी संपेना त्याने मला असे प्रश्न

३० जुलै २०१९.


अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

विचारणं मला कधीचं अपेक्षीत नव्हतं पुढे माझं व त्याच्या दोन मित्रांचं भांडणं झालं. आम्ही एकमेकांशी सतत बोलणं टाळत असू त्याचे मित्र व तो माझ्याशी बोलायला येतं. पण मला बोलायचं नसल्याने मी त्यांना सतत टाळत असे. एकदा असचं ते तिघेही सोबतच कॉलेजच्या कट्ट्यावर बसले होते. मी माझ्या इतर मित्र-मैत्रिणींना भेटायला तिथे गेले. तेवढ्यात कोणीतरी शौनकला म्हणालं, "शौनक गाणं गा ना..." तेव्हा तो गाणं गायला तयारचं होता. व माझा आवाज ऐकताच त्याने गाणं गायला सुरवात केली आणि ते गाणं होत.

बहारो फुल बरसाओ मेरा मेहबूब आया है।
मेरा मेहबुब आया है।



३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

# असे हे राजकारण...

सारे अघटित घडले
वेड्यांचे इस्पितळ ओस पडले
विचारता असे काय घडले.
तो म्हणाला ते सर्व राजकारणातच पडले.

राजकारणी असतात गोल
भाषणात सुटतो त्यांचा तोल
करतात सावरण्याचा प्रयत्न फोल
आणि सतत पिटतात प्रचाराचा ढोल'

लोकशाहीने लोकांना दिले फक्त व्होट
पुढाऱ्यांना इतके दिले त्यांचे सुटले पोट
तरी ही ते म्हणती 'ये दिल मांगे मोर'
मुक्त झाले पुढारी, गुन्हेगार स्मगलर आणि
बंडखोर।

असतात सरकारी नोकर
तुमचेही दास
फक्त फरक इतकाच
की ते असतात सतत उदास

निरपराधी साप?
राजकारण्याच्या घरात दडला
त्याने तो हाताने काढला
बिचारा साप विषाने मरून पडला

- अक्सा खान


३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

## आई

दुपारचे १२.३० वाजलेले. आम्ही सर्वजण नुकतेच काम आटपून शांत बसलो होतो. तेवढ्यात माझा एक सहकारी धाईधाईने माझ्याजवळ आला आणि त्याने मला फोन दिला. मी त्याला विचारले काय झालं? कोणाचा फोन? तो म्हणाला, " अजय, सरांचा फोन आहे. तुला ताबडतोब घरी जावं लागेल' मला काहीच समजेना. मी थरथरत्या हाताने फोन घेतला, माझे सर मला सांगत होते," अजय, तुझ्या आईची तब्येत बरी नाहिये, काही सांगता येत नाही. तू लगेच घरी जा. "हे शब्द ऐकून माझ्या पायाखालची जमीन सरकते की काय असे मला वाटू लागले. मी कसाबसा धीर करून घरी जायला निघालो. माझा सहकारी पण माझ्याबरोबरच होता.

घरी पोहचल्यावर दारातच माझा एक मित्र माझी वाट बघत होता. मला काहीही प्रश्न विचारू न देता तो मला हॉस्पिटल मध्ये घेऊन गेला. हॉस्पिटलमध्ये माझा भाऊ पाणावलेल्या नजरेने माझी वाट पाहत होता. मी त्याला विचारले अरे, काय झालयं ते तर सांगा." नको नको ते विचार माझ्या डोक्यात थैमान घालू लागले. भाऊ सुद्धा काही बोलण्याच्या मनास्थितीत नव्हता. तेवढ्यात मित्रानेच सांगितले, 'अजय, आईची तब्येत बरी नाहिये आणि डॉक्टरांनी सांगितलयं की, आई कदाचित कोमात जाण्याची शक्यता आहे.' हे ऐकताच माझ्या डोळ्यासमोर अंधारी आली, हातापायातली शक्तीच




गेल्यासारखं झालं. काय बोलू ? हे सुचेनासं."
कसाबसा धीर एकवटून मी, माझा भाऊ आईच्या वॉर्डमध्ये गेलो. आई शांतपणे पलंगावर झोपून होती. मी आईच्या बाजूला जाऊन बसलो. काय करू हेच सुचत नव्हते.

तितक्यात डॉक्टरांनी माझ्या पाठीवर थोपटले आणि काळजी करू नकोस, "मी आहे". असा दिलासा दिला. त्यांच्या एवढ्या वाक्याने पण मला धीर आला आणि त्यांच्या रूपाने देव समोर असे वाटले.

थोड्यात वेळात आईला आय सी यू मध्ये हलवण्यात आले. जवळ जवळ अर्ध्यातासाने ICU मधून बाहेर आले. तो अर्धातास आमच्यासाठी कसा गेला याचे शब्दांत वर्णन करता येणार नाही. आम्ही सगळे सतत देवाचा धावा करत होतो. जेव्हा डॉक्टरांनी सांगितले आईची तब्येत आता बरी आहे, धोका टळला आहे, त्यांचे हे शब्द ऐकताच एवढा वेळ जी हिंमत धरून ठेवली होती. ती माझ्या डोळ्यांतून येणाऱ्या आसवांनी मोकळी झाली. वारंवार मी देवाचे आभार मानले आणि डॉक्टरांचे सुद्धा.

त्यावेळी मला झालेला आनंद मी शब्दांत वर्णन करूनच शकत नाही. कधी एकदा आईचा चेहरा बघतो असं मला झाले होते.

हा दिवस माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस!


Parshuram
14-02-2019

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

माझं घर

घर म्हणजे काय? सुख, समाधान, सजावट स्वप्न हो। स्वप्न. गावी आपलं स्वतःच हक्काचं घर असणं प्रत्येकाचं स्वप्न असतं. तसंच एक स्वप्न माझ्या आई-वडिलांनी सुद्धा बघितलं, ते स्वप्न ते जगले आणि यांच्या सोबत मी सुद्धा ते स्वप्न जगले ते स्वप्न ते रोज जगत असत, या स्वप्नाच्या दिशेने ते रोज एक पाऊल पुढे जात. २०१० मध्ये रायगड माणगाव येथे यांनी एक छोटीशी जागा घेण्याचा प्रयत्न केला. पण काही कारणास्तव ते फिसकटलं यानंतर गावच्या घराचं स्वप्न मात्र आमच्या तिघांसाठी स्वप्नच राहिलं. पुढे काही वर्ष आमच्या घरात गावच्या घराचा विषयसुद्धा नव्हता यानंतर २०१६ मध्ये मात्र आमच्या ह्या स्वप्नाने नव्याने भरारी घेतली.

ह्या वेळेला मात्र हिरव्या झाडांची गर्द सावली, भातांचे शेत,

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

सारावलेल्या जमिनी, घाटातली नागमोडी वळणं आणि समुद्राच्या शांत आवाजाने संमोहित करणारे कोकण आम्हाला खुणावू लागले. आमचे पाय रत्नागिरीतल्या दापोली ह्या गावाकडे वळले. जसजशी आमची गाडी कोकणातले घाट चढू लागली, तसतसे आम्ही आमच्या स्वप्नाच्या जवळ येत गेलो. दापोली ह्या गावात वेगवेगळ्या जागा आम्ही पाहिल्या. पण आम्हाला हवी तशी जागा सापडेना. शेवटी आम्हाला 'PPROM DEVELOPERS' चा बोर्ड तिथे दिसला 'एकदा चौकशी तर करून येऊ' हा विचार करून आम्ही त्यांच्या साईटवर गेलो. ती साईट आणि तिथली माणसं आम्हाला फार आवडली. एका परिपूर्ण असलेल्या ह्या बंगलो टाऊनशीपने आम्हाला मोहिनी घातली. त्यातला एक प्लान आम्हाला आवडला आणि आमची वाटचाल ह्या स्वप्नपूर्तीकडे वळली. १७ एप्रिल २०१७ ला आम्ही आमच्या घराचं बुकींग केलं. जांभ्या दगडांच्या कोवळ्या भिंतींमध्ये आम्ही आमचा छोटासा बंगला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

सजवू लागले. आम्ही आमच्या बंगल्याचं नाव सुद्धा ठरवलं 'रामकृष्णाई' १८ ऑक्टोबर २०१८ ला आम्हाला आमच्या घराच्या तावा मिळाला. ९ नोव्हेंबर २०१८ ला आम्ही घर भरणी केली. आपल्या हक्काच्या घरात पाय टाकताना अंगावर येणारा शहारा भरपूर सुख देतो.

ह्या कालावधीत भरपूर काही शिकायला मिळालं. माझ्या आई-वडिलांची जिद्द ज्यामुळे आमचं हे स्वप्न पूर्ण झालं. बघितलेलं स्वप्न पूर्णत्वाला न्यायचं हे मी माझ्या आई-वडिलांकडून शिकली. ते स्वप्न पूर्ण होण्यासाठी त्यांनी केलेली मेहनत मी पाहिली. मेहनतीला पर्याय नाही हे मी त्यांच्याकडून शिकली. जिद्द, चिकाटी, आकांक्षा आणि मेहनत ह्या बळावर मी माझं पुढचं स्वप्न आता पूर्ण करणार आहे.



३० जुलै २०१९.

अंक पहिला




# छोटीशी गंमत

दिवाळीचा सण होता. दिवाळी सूरू झाल्यावर लक्ष्मीपूजेच्या दिवशी संध्याकाळी आमच्या घरच्या मजल्यावर लक्ष्मीची मोठी पूजा होती. त्यामुळे त्या घरातल्या माणसांनी माझ्या आई-बाबांना पुजेसाठी बोलावलं होत. त्यामुळे आई आणि बाबा मला व माझ्या बहिणीला घरी ठेवून पुजेसाठी गेले.

मी आणि माझ्या बहिणीने दाराला आवून कडी लावून घेतली. पूजा मोठी होती. त्यामुळे आई-बाबांना घरी परतायला थोडावेळ लागणार होता. आणि मी आणि माझी बहिण मनाली दोघीही दार लावून घरात झोपून गेलो. थोड्या वेळाने आई-बाबांनी दरवाजा ठोकला पण आम्ही गाढ झोपलो होतो. व त्यामुळे आम्ही दरवाजा उघडला नाही. पण तरीही खूप वेळ आई- बाबा दरवाजा ठोकत होते. थोड्या वेळाने बिल्डींग मधली माणसं देखील जमा व्हायला लागली. व आमच्या मजल्यावर येऊन जोर-जोरात दरवाजा ठोकू लागले. आमच्या दोघींचा नावाने ओरडू लागले (मनाली, प्रणाली दरवाजा खोला) अशा प्रकारे हाक देवू लागले पण आम्ही दोघी काही उठलो नाही. मग थोड्या वेळाने बाबा गच्चीवर गेले व काही माणसंही गेली. ते त्याच्या सोबत मोठी व जाड दोरी घेवून आले. व वरती पाईपला बांधली. व ती दोरी गच्चीवरून खाली सोडली. पप्पांनी (बाबांनी) दोन्ही हाताला रुमाल बांधला व दोरी धरत खाली आले. दोरी सुटेल या भितीनें बिल्डिंगमधल्या माणसांनी दोरी घट्ट धरून ठेवली.


३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

दिवाळीचा सण असल्याने खिडकीत कंदील लावले होते. कंदिलाचा वायरसाठी खिडकी थोडी उघडी ठेवली होती. बाबा खिडकीच्या सहृयाने आत आले. त्यांनी दरवाजा उघडला आईला आत होतले व बाहेरचा लोकांनाही आत होतल. सकाळ झाली. आई-बाबा आम्हाला याविषयी काहीच बोलले नाही. किंवा ओरडले ही नाही.



३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

# अबोली

मी अबोल आहे. मला बोलायला फारसे आवडत नाही. पण आहे मात्र मी आमच्या-तुमच्या सारखीच. मी बोलत नसली तरी मला व्यक्त होता येत. मी फारशी मोकळीच समजे स्वतःला इतर सतत कोणत्याही गोष्टीत पुढाकार होणाऱ्या व तोंडाशी ताफ सतत वाचा चालवणाऱ्यांनाच किंमत असते. नाही का? ते म्हणतात ना बोलणाऱ्याची मातीही विकली जाते पण न बोलणाऱ्याचे सोनंही विकलं जात नाही. मग शेवट सगळं ऐकूनही मी माझा स्वभाव बदललेला नाही. मुळातच असलेला स्वभाव कसा बदलता येईल. माझ्या ओळखी फार कमी आहेत. अर्थात तीच ३ माझ्या अबोल स्वभावामुळे पण माझ्याकडे कला आहे. नवीन विचार आहेत. पण मिश्या स्वभावामुळे ते कोणालाही दिसून येत नाही. याची मला नेहमी खंत वाटते. मिश्या याच एकटेपणात मला वाचनाची आवड लागली. माझे पुस्तक माझे मित्र होतात व माझ्याशी बोलू लागतात. मग माझा एकटेपणा दूर होतो. मग कधी-कधी मला असं वाटत पुस्तक जरी माझे मित्र असले तरी सोबतीसाठी तर माणसं हवीत ना मित्र-मैत्रिणी हव्या. मग समाजातल्या लोकांच्या स्वभावाच्या रंगीत छटा पाहून मला पुस्तकच खूप जवळीक वाटू लागतात. आणि मग असंख्य पुस्तके माझे मित्र होऊन माझा एकटेपणा दूर करतात.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

## लग्न

गेल्या वर्षी मी बेळगाव मध्ये एका लग्नाला गेले होते. बेळगावमध्ये अत्यंत प्रतिष्ठित लग्नाला गेलेल्या एका मंगल-कार्यालयात हा विवाहसोहळा संपन्न होणार होता.

जिचं लग्न होणार होतं ती पुजा अतिशय श्रीमंत घराण्यातील मुलगी. ती स्वभावानं चांगली होती. हुशार व अभ्यासु होती. तिचं लग्न ज्याच्याशी ठरलं होतं, तो मुलगासुद्धा उच्चशिक्षित होता. नोकरीत खुप वरच्या पदावर होता. पुजाने आपल्या मित्र-मैत्रिणींना बोलावलं होतं. त्यात एक मी सुद्धा होती. लग्नमंडप भव्य होता. नानविध रंगाच्या शोभिवंत फुलांनी तो सजवलेला होता. ती फुलं खास कुठून तरी मागवण्यात आली होती. जागोजागी कृत्रिम कारंजी बसवलेली होती. त्यातून सुवासिक पाण्याचे फवारे उडत होते. लग्नाचं ते ठिकाण आनंदमय वातावरणानं भरून गेलं होतं. नखशिखांत हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांनी मढलेल्या स्त्रिया तेथे होत्या. पुरुषांचा रुबाबही काही कमी नव्हता. शेरवानी, कुर्ता असा पेहराव केलेली मंडळी दिसत होती. लहान-लहान मुलं खुप सुंदर दिसत होती. नवविवाहित दाम्पत्याला भेटून शुभाशीर्वाद देण्यासाठी व्यासपीठाजवळ भलीमोठी रांग लागलेली

मराठी प्रबोधन

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

होती. सर्वच मंडळी श्रीमंत होती. वधूवरांवर देणाऱ्या व भेटवस्तूंचा नुसता वर्षाव होत होता. बाजूलाच त्या भेटवस्तूंचा भलामोठा ढीग जमा झाला होता. मी जरा दूर बसून पूजा आणि तिचा नवरा निरीक्षण करत होते.

पूजाच्या अंगावर जो नववधूचा पोशाख होता, त्याची किंमतच साधारणतः काही लाखांच्या घरात असेल ते जोडप जरी आनंदात असल तरी त्या दोघांचे चेहरे थकलेले दिसत होते. माझ्याबरोबर आलेली माझी मावस म्हणत होती. जणू "सुखाच्या राजकन्येचंच लग्न आहे असं वाटतंय!" त्यानंतर आम्ही सर्वांनी जवळ जाऊन त्या दोघा वधुवरांना त्यांच्या वैवाहिक आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर आमच्यापैकी प्रत्येकाला घरी जाण्यापूर्वी एक भेटवस्तू देण्यात आली. ती भेट म्हणजे साडी होती. आपल्या एकुलत्या एक मुलीच्या लग्नासाठी वडिलांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला होता.

त्यानंतर बेळगावमध्येच काही दिवसांनी मी एका पार्टीला गेले होते. संपूर्ण शहरातील अतिमहत्त्वपूर्ण व्यक्तींनी तिथे आपली उपस्थिती लावलेली होती. एकीकडे भरपूर गप्पागोष्टी सुरू होत्या

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

श्रीमंतांच्या उच्चभ्रू बायका म्हणे उन्हाळा कसा वाढत चालला आहे. याविषयी बोलत होत्या. पुरूष मंडळी बाजारात आलेल्या मंदीच्या लाटेविषयी बोलत होते व ते महागाईच्या निर्देशांकांची चर्चा करत होते.

मला तिथे एक तरूण भेटला. तो देखणा उमदा होता. उत्साहाने नुसता सळसळत होता. ही पार्टी आयोजित करणाऱ्या लोकांपैकीच तो एक होता. तो एका बहुराष्ट्रीय कंपनीत चांगल्या वरच्या पदावर होता. त्याला आपलं कुठेतरी पाहिलय असं मला सारखं वाटत होतं. पण नक्कीच कुठे ते काही आठवत नव्हतं. पुढ्यात त्यानं माझ्याकडे पाहून ओळखीचं हास्य केलं आणि जेवल्याशिवाय जायचं नाही हं"! अशी विनंतीसुद्धा केली. याचा अर्थ तो मला ओळखत होता. पण मी काही त्याला ओळखलं नाही. मी बुचकळ्यात पडले. पुढ्यात जरा लांब उभी असलेली पूजा माझ्या नजरेस पडली. मी तिच्याजवळ जाऊन विचारलं "तू इथं कशी?" त्यावर माघच्या तरूण व्यक्तीकडे बोट दाखवून ती म्हणाली "तो माझा नवरा आहे"? पण तिच्या शब्दामध्ये कुठंही मला अभिमानाची छटा दिसली नाही.

पूजा अशक्त व विपन्न दिसत होती ती आजारी आहे. असं वाटत होतं. तिच्या

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

चेहऱ्यावर किंचितही आनंद नव्हता. तिचे डोळे सुजलेले होते. वेशभूषाही गबाळीच होती. मी तिला काही विचारणार तेवढ्यात तिचा गळा भरून आल्याचं मला जाणवलं मग आम्ही दोघी तिला रडू दिलं. काही वेळा नुसतं रडण्यानेही माणसाच्या मनावरील ताण हलका होण्यास मदत होते. थोड्या वेळानंतर आपण होऊनच तिनं स्वतःची परिस्थिती वर्णन केली. आपल्यावर प्रचंड मानसिक ताण असल्याचंही तिनं सांगितलं. मला ते ऐकून फार वाईट वाटलं. हिच्या बाबतीत काय घडलं असावं? काय चुकलं असावं? तिच्या लग्नाच्या वेळी तर सगळं कसं व्यवस्थित होतं हुंड्यांविषयी, देण्याघेण्याविषयी काही चर्चा नव्हती. पती चांगला शिकलेला होता. पण पुजाची कहाणी वेगळीच होती. ती म्हणाली प्रत्येक विवाहित स्त्रीला जर आपल्या संसारात सुखी व्हायचं असेल. तर त्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पतीपत्नीचा परस्परांवरील विश्वास आणि त्यांना वाटणारा आदर. पण ही गोष्ट पुरुष समजून घेत नाहीत. त्यांची अशी समजूत घेत नाहीत. त्यांची अशी समजूत असते की कुठला आपण आपला पत्नीचा

(2)

हातात ठेवून दिलं की झालं. मग घराबाहेरच्या जगात आपण पत्नीला विश्वासात न घेता काय वाटेल ते केलं तरी चालतं. आपली पत्नी तेवढ्यात सुखी होते. पण हे खरं नाही. प्रत्येक पत्नीची अशीच इच्छा असते की आपल्या पतीनं आपलं मन विचारात घ्यावं. पतीपत्नींनं एखाद्या बाबतीत एकमत नाहीच झालं, तर पत्नीला आपलं म्हणणं पटवून देण्याचा पतीनं प्रयत्न करावा प्रसंगी वादसुद्धा घालावा पण जे काही घडतंय त्याची त्यानं तिला माहिती जरूर दिली. यालाच विश्वास असे म्हणतात. त्यासाठी काही काळ द्यावा लागतो. विश्वास काही पैशानं खरेदी करता येत नाही. मोठ्या लग्न-मंडपात लग्न लागलं म्हणजे काही विश्वास मिळत नाही. वैवाहित जीवनातील सुखाची प्रत्येक व्यक्तीची व्याख्या निराळी असते. ती सापेक्ष असते. पण यात एक गोष्ट मात्र सर्वांसाठी सारखीच असते. "परस्परां-वरील विश्वास, त्याचप्रमाणे एकमेकांवरील श्रद्धा आणि परस्परांसाठी त्याग करण्याची वृत्ती. यातूनच वैवाहिक जीवनाचा पाया भक्कम होतो. मला असे वाटते की, लग्न अयशस्वी होतात. तेव्हा

३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक


त्यामध्ये बहुतांशी मुख्य कारण
ते म्हणजे पतीपत्नीच्या नात्यातील
विश्वासाचा अभाव. लग्न म्हणजे केवळ
आर्थिक सुरक्षितता मूक समारंभ, सामाजिक
प्रतिष्ठेचे प्रतीक आणि आपली जबाबदारी
दुसऱ्यावर सोपवणं मुख्य होऊन बसतं.
पण लग्न झालेल्या किती जोडप्यांना हे
समजलायं की आता आयुष्याचा प्रवास
आपण दोघांनी बरोबरीने हातात
हात घालून करायचा आहे

मुसळधार पाऊस असो, खडकाळ
रस्ता असो. काळी रात्र असो नाहीतर
काट्याकुट्यांनी भरलेली वाट. दोन्ही
बाजुंनी झाडांची शीतल छाया असलेला
मार्ग असो, नाहीतर दाहक उन्हाळ्याचा
ताप जर सुरक्षितपणे मार्गक्रमण करायच
आहे, तर परस्परांवर गाढ विश्वास
असलाच पाहिजे. वैवाहिक जीवनामध्ये
विश्वासाची जन्मभर साथ असते.
तिथे हिरामोती कामाला येत नाहीत
पैसा कामाला येत नाही. तर
माणसाच्या परस्परांवरील विश्वास ही
सर्वात मोठी गोष्ट असते.

(६)



मराठीप्रबोधन



13-02-2019

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

## माझं गाव

माझं गाव वडाच्यापाठ. तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग. गाव म्हटलं की जिव्हाळा आला. आणि त्यासोबत तो जिव्हाळा निर्माण करणारी माणसं, आपली माणसं.

सुट्टीत कुणाकडे जायचं तर मामाच्या गावी, पण मला विचारायला गेलात तर मामाचा गाव हा मला नावापुरताच मोहिती. अगदी लहानपणासुनच मी बालगीतातुन मामाच्या गाव अनुभवायचो. पण प्रत्यक्ष तो कधी पहायला मिळाला नाही असं का? असा प्रश्न मला पडायचा. आणि त्रास करून हा प्रश्न मला सुट्टीच्या दिवसात सुणावायचा. मी मामाच्या गाव का पाहु शकले नाही. याची कारणे मला फक्त ऐकुण माहिती आहेत. ती किती खरी आहेत याचा शोध मी कुणाकडूनही घेण्याचा प्रयत्न केला नाही.

जिव्हाळयाची सुरुवात होते ती आपल्या आजी- आजोबापासुन. गावी पोहचलं की आजी मायेने डोक्यावरून हात फिरवेल. आवडीचे पदार्थ करेल, खुशाली विचारेल. आजोबांचे डोळे आनंदाने भरून जातील. जवळचं वातावरण आनंदमय होऊन जाईल. पण यातलं काहीच माझ्यासोबत झालेलं नाही. ना आईचे, नावडिलांचे. हे आनंदाचे क्षण फक्त माझ्या मित्र- मैत्रणीच्या गप्पांमधुन माझ्या कानावर

पडतात. आणि लहानपणीच्या गोष्टी व बाल-गीतातुन,

जेव्हापासुन मला कळु लागलं की, आजी-आजोबा म्हणजे काय? अगदी तेव्हापासुन मी त्यांच्या प्रेमाची फार भुकेली आहे, आणि राहील. माझ्या वडिलांचे आईवडिल नाही कारण ते आमच्या जन्माआधीच मरण पावले. आम्ही गावी गेलो की आमचे काका नेहमी म्हणायचे आणि अजुनही म्हणतात,

तुझ्या वडिलांची आई खुपच चांगली होती ती आम्हाला खाऊ-पिऊ घालायची, आमच्यावर फार प्रेम करायची. मला ऐकुन फार समाधान वाटायचं आणि वाईट ही वाटायचं की आपल्याला भेटता आलं नाही. तिचं प्रेम अनुभवता आलं नाही.

माझ्या आईच्या आई-वडिलांची तर गोष्टच वेगळी. बरं तर त्यांच्याबद्दल न बोल-लेलंच बरं असं मला नेहमी वाटतं. आईच्या लग्नानंतर तिची आई आमच्याकडे यायची, पण काही कारणांनी तिचं कायमची येणं बंद झालं. ती अजुनही माझ्या वयाच्या 22 व्या वर्षापर्यंत कधीच मला दिसली नाही. किंवा तिचे बाबा (आईचे) म्हणजेच आमचे आजोबा ते काळे का गोरे हे अजुनही मला माहिती नाहीत. पण ते जिवंत आहेत, आई कधी गावी गेली. तिच्या आईवडिलांना भेटून येते. पण वडील कधीच जात नाहीत. त्यांचे कशामुळे

वाद आहेत हे अजुनही मला माहित नाही. आणि ज्या माणसांना मी पाहिलं नाही त्यांच्या-विषयी जाणुन घ्यायची मला गरज ही वाटत नाही. पण मला त्यांना प्रत्यक्ष भेटायला आवडेल.

आमचं गाव तसं फार सुधारलं आहे. म्हणजे ते पुर्वी खेड होतं. जाती-पाती होत्या. त्या अजुनही आहेत. पण मातीची घर चिऱ्यांची झाली. आणि मातीच्या रस्त्यांचेही डांबरीकरणं झाले. जी आपल्या आमच्या गावात आमच्या घराच्या समोरच आमची चुलत आजी राहते. आम्ही कधी गावी गेलो. की आजी म्हणुन तिच्याकडे धाव घ्यायची. तो तिला अगदी खऱ्या आजी सारखी कडकडुन मिठी मारायची. ती प्रेमळ आहे. पण थोडी चिवट आहे.

आमचं गावचं घर तसं मोठं आहे, एरवी ते बंद असतं. आम्ही गावी गेलो की आमच्या घरचे दरवाजे आम्हीच उघडतो. वडील एकटेच असल्याने सख्खे काका ही नाहीत. पण आत्या आहे. पण आम्ही मुंबईला असलो की गावचं घर बंदच असायचं.

आम्ही या आमच्या घरी असलो. की काही दिवसांनी घर खायला उठतं. मग आजी- आजोबांची गरज वाटते आणि रात्रीच्या वेळी कुणाच्या तरी कुशीत जाऊन गुडूप व्हावं असं वाटतं.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

नातेवाईक म्हणजे काय? हे मुळात मला माहितीच नाही, असं म्हणायला हरकत नाही. आमच्या आजुबाजुला चुलत काका आहेत. पण त्यांच्याशी संबध फक्त नावापुरता ऐकमेकांच्या चुगली चहाडी करणं हा आमच्या कोकणी लोकांच्या आवडता छंद तसाच तो यांचाही.

आमच्या नातेवाईकासमोर आमच्या विषयी वाईट बोलणं, आमच्या चुका काढणं. आमच्यावर हसणं आम्ही म्हणजे (त्यांच्या) चार मुली आणि एक मुलगा आम्ही भावंड) आम्हाला शिव्या देणं हा त्यांच्या आवडता छंद. कदाचित म्हणुनच आमचे नातेवाईक आमच्या तितके जवळ नसावेत. कदाचित त्यांच्या परिस्थितीने त्यांना हेच शिकवलं त्यांना माणुसकी पेक्षा त्यांची तत्वे फार महत्वाची वाटतात. प्रत्येक माणसांसमोर आपला तत्वांचा बडेजाव करणं त्यांना फारचं आवडतं. त्यांच्या या तिरकस स्वभावामुळे आमचे असे फारसे नातेवाईक असुनही नाहीत. ही त्यांच्या याचं स्वभावामुळे माझ्या आईचे आई-वडील दुरावले असं मला नेहमी वाटतें.

माझे मित्रमैत्रणी जेंव्हा त्यांच्या नातेवाईकांच्या गमती-जमती सांगतात तेंव्हा मला फारचं वाईट वाटतं. आमच्येचे नातेवाईक असे का. असा मला नेहमी प्रश्न पडतो.



मराठीप्रबोधन

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

आशय मराठमोळं नियतकालिक

त्यातल्या-त्यात म्हणायला गेलं तर चुलत काकाच्या मुली आमच्याच वयाच्या. त्यांत आणि आमचं फारचं जमायचं. आम्ही गावी गेलो की कुणी का भेटेना. पण त्या भेटतील. या एका गोष्टीचा आम्हांला फारच आनंद वाटायचा. आम्ही खूप खेळायचो. मज्जा करायचो. अजुनही त्या आठवणी आनंद देऊन जातात. आणि पुन्हा गावची ओढ सतावते पण आमच्या या काकासोबतही आई-वडीलांनी मागेच गणपतीत भांडण केल्याने आम्हाला भेटता येत नाही. यांच आम्हांला फार वाईट वाटतं. आणि त्यांच्याशी बोलली हे कळलं की ओरडा मिळतो. मोठ्यांच्या या भांडणात आमची फरफट होते.


लिहायचं तर होतं आपल्या गावाबद्दल, पण मी गावाबद्दल काय लिहिणार ? खरं तर माझी काहीच लिहायची इच्छा नव्हती. कारण आम्ही कधी गावी गेलो तर कायम घरीच राहायचो. फिरायला वगैरे कधी जाताच आलं नाही. कारणं वडिलांचं नेहमीचं ठरलेलं वाक्य एवढ्या सगळ्यांना घेऊन कुठे जायचं फिरायला.

त्यामुळे ना फिरणं ना नातेवाईकांकडे जाणं. त्यामुळे लिहिण्यासारखं होतं ते मी लिहिलं. आता मोठं झाल्यावर तरी आम्ही बहिणी गावी जाणं टाळतो. मग आईवडील आणि लहान बहिण गावी जाणं टाळतो.

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

आई-वडील आणि लहान बहीण-भाऊ दोघेच जातात. आमच्या गावच्या घरात गणपती बसतो. त्यामुळे अनेक सणांच्या निमित्ताने ते वर्षातून चार वेळा तरी गावी जातात. सांगायचं झालं तरं मी मालवण ला आत्या-कडे गेल्यानंतर समुद्र पहायला जायचे.

मला समुद्र फारच आवडतो. त्यामुळे गावाशी संबंधित माझ्या काही हरकत नाही. खरं तर अशा वातावरणात पुन्हा कधीच मला माझ्या गावी जायला आवडणार नाही. तिथे आपलावर हक्काने प्रेम करणारं कुणी नसेल. किंवा आपला येण्याची सतत वाट पाहणारं कुणी नसेल. अशा ठिकाणी मला कधीच जायला आवडणार नाही.



३० जुलै २०१९.
अंक पहिला
क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

'एन.सी.सी'च्या आठवणी...

"कधी तरी मनाला भास तुमचा होतो
मग ओलावल्या डोळ्यावर हात तुमचा येतो
डोळ्यासमोर येवून म्हणे 'सच-दायने-सच'ची गाणी
क्षणातच अदृश्य मग डोळ्यात माझ्या पाणी
काटे फिरवून घड्याळीने कसा घेऊ मागे क्षण
ओठी नाव तुमचे SUO, JUO अन सारेजण..."

आज दुपारी मला सहजच आमच्या NCC च्या दिवसांची आठवण आली. मग मी फोनमधले आपले Camp, Parade चे फोटो बघत बसलो. अन आपल्या सर्वांना compulsory असलेला NCC किट उघडून त्याला बघत - निरखत बसलो. मला आपण सर्वांनी म्हणजे अजित, हर्षद, दिपक, अक्षय आणि 1st years यांनी घाटकोपर येथील होमगार्ड centre वर 6 MAH BN आयोजीत केलेला ATC कॅम्प व त्यात आपण सर्वांनी आनंदात घालवलेले क्षण आठवू लागले. या आपल्या NCC च्या शेवटच्या वर्षातील सर्वांनी एकत्र मिळून केलेल्या कॅम्प मधील सगळेच क्षण माझ्या आवडीचे आहेत. पण त्यांमधील मला दोन आठवणी खूप

आवडतात. त्यातला पहिला उत्तम क्षण म्हणजे, सगळ्या खडतर प्रशिक्षणानंतर दुपारची वेळ मजेत घालवण्यासाठी इतर कॉलेजचे Cadets आपल्या सोबत गाणी म्हणायला यायचे. त्या गाण्यांना उगाचच ताल देण्यासाठी ताट, वाट्या पेले, चमचे यांना बडवून तयार केलेलं एक उत्तम संगीत असायचं व तेथून PI staff चा आवाज येताच, चटकन आपल्या बेडवर जाऊन केलेली झोपायची नक्कल चांगली आठवते. आपण साखरे नावाच्या मुलाची कपडे तो आंघोळीला गेला असताना दडवून ठेवलेली होती व तो नग्न अवस्थेत फक्त टावेल गुंडाळून अख्या बॅरेकभर फिरत होता हे आठवून हसायला येतं व ते हसणे थांबवणे जवळ-जवळ अशक्य होते. आणि दुसरा सर्वोत्तम क्षण म्हणजे camp च्या शेवटच्या दिवशी जेव्हा बडा-खाना असतो तेव्हा आपण कार्यक्रमात गायलेलं 'कंधो से मिलते है कंधे' हे गाणं व या गाण्याला मिळालेलं पारितोषिक अजुनही आठवते. विशेष म्हणजे CO सरांकडून मिळालेली शाब्बासकी आठवते व अंगात रोमांच संचारतो. त्याच बडाखान्याच्या दिवशी रात्री ९ वाजता

मेसमध्ये हळूच घुसून खाल्लेली खीर-पुरी व चिकन हे आठवलं की तोंडाला पाण्याची धास्य लागते. ते आपले NCC चे दिवस आयुष्यातील सोनेरी दिवस होते असे म्हणायला काही हरकत नाही.

पण बरं आहे की, फोन चा व कॅमेराचा शोध लागला. त्यामुळे आपले फोटो बघता येतात, एकमेकांना फोन करून जुन्या आठवणींना उजाळा देता येतो. शेवटी हेच म्हणावे वाटते-

'गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी'

Miss you यारहो...

— तुषार प्रमोद आमाते
तृतीय वर्ष कला (इतिहास)
[signature]

३० जुलै २०१९.
अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

आशय मराठमोळं नियतकालिक

# स्त्री म्हणजे काय?

स्त्री म्हणजे काय?
पावसाची सर?
आभाळाकडून हातात घेऊन मातीमध्ये मिळायचं!

स्त्री म्हणजे काय?
ओंजळीतलं पाणी?
अलने नाही सांभाळलं तर कुठे तरी पडायचं!

स्त्री म्हणजे काय?
सागराची लाट?
कितीकदा फेकलं तरी ही जाऊन मिळायचं

स्त्री म्हणजे काय?
चरख्याचं चाक?
किती ही दमलं तरी ही चालायचं
स्त्री म्हणजे काय?
वेलीवरचं फूल?
खुडतांना वेदना झाल्या तरी सुंदरशा फुलायचं

स्त्री म्हणजे काय?
गवताची पात?
इतक्याशा वाऱ्या पुढे ही झुकायचं!
स्त्री म्हणजे काय? स्त्री म्हणजे काय?

अक्सा खान

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.




# मुलीची कहाणी!

ईश्वराने जीवनदान दिले,
आईवडिलांनी कन्यादान केले.
निवडल्यावर नाही भागले,
म्हणून सासरच्यांनी प्राण घेतले,
सगळ्यांच्या सुखासाठी हसत हसत दिले.
ज्यांच्यावर होता विश्वास,
आज त्यांनीच घेतला घास.
आईवडिलांवर केली माया,
त्यांनाही नाही आली दया.
बाबा! तुम्हांला मुलगी नको होती,
पण लेक म्हणून मी कोणाला तरी हवी होती.
मला माहित आहे माझ्या जाण्याचे नाही तुम्हाला दुःख,
पण तुम्हांला सोडून जातेय याचे मला आहे हो दुःख.
माझ्यासाठी नका आणू डोळ्यात अश्रू,
कितीही सोंग केले तरी दिसतयं गालावर हसू.
माझ्या जाण्याने होईल तुम्हांला आनंद,
पण तुम्हांला सोडून गेल्याची मला वाटेल खंत.

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.
आशय मराठमोळं नियतकालिक

मन माझे मोडून, सगळे गेलात ना सोडून,
मी जातेय आता मग दाखवताय रडून.
मानलं मी सगळ्यांना आपलं,
पण मुलगी म्हणून तुम्ही मला नाही जपलं,
तुम्ही तर मला कधीच केलत पोरकं
मीच माझ्या मनाला समजवलं सारखं,
किती ही म्हटलं तरी ही आपलीच माणसं.
आता मात्र खूप झालं, पाणी डोक्यावर आलं,
म्हणून नाती दिली तोडून, जातेय तुम्हांला सोडून.
तुम्ही सुखी रहा ही फक्त आस,
नाही दिसणार आता मी तुमच्याजवळ पास.
तुम्ही सगळे आहात खूप छान,
फक्त तुम्हांला नव्हती माझी जाण.
शेवटचे By बोलून घेते आता निरोप,
हे माझे मनोगत आहे, नाही तुमच्यावर कोणते आरोप.

— अक्षता नारायण माने

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.




# शेतकरी.

जो जगवतो आपल्याला, धान्य पुरवतो जगाला,
तो जगावा असे वाटत नाही का सरकारला?
जय जवान, जय किसान म्हणायची आज आहे का लायकी?
माणसाने ओळखून वागावी आपली पायरी.
घोषणा करताना असतो खूप जोर,
मदतीच्या वेळी सगळेच होतात चोर.
जगायच कस शेतकऱ्यानं सांगाव सरकारनं,
खुर्चीपेक्षा जीवन बघा शेतकऱ्याचं, नाहीतर खर नाही जगायच
भारताला म्हणता कृषिप्रधान,
शेतकऱ्याला म्हणता भूमिपुत्र,
बघा जरा शेतकऱ्यांकडं
हाल त्याचं खातय तरी का कुत्र?
शेतकरी जगवतोय सगळ्यांना याची ठेवा जरा जाण,
जमलचं तर माणूस म्हणून त्यालाही द्या मान.
धान्याला त्यांच्या मिळावा चांगला भाव,
नाही याहून अधिक त्यांना कसलीच हाव,
इतकच आहे त्याचं म्हणणं, नाही आणखी कसलच मागणं
भरभराट होईल देशाची,
एवढं ऐकलं जर सरकारनं.

— अक्षता नारायण माने

३० जुलै २०१९.
अंक पहिला
क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग
आशय मराठमोळं नियतकालिक

## सेल्फी.

सेल्फ असेल खरा तर गरज काय सेल्फीची,
सेल्फ असेल खरा तर गरज नाही दुनियेची.
किमया बघूया आज सेल्फीची
माणसाच्या स्वभावातील गंमतीची.
सेल्फी म्हणजे जग,
त्यात एकूणएक नग,
जमतात एकत्र मग
अन् नुसत ह्याला बघ अन् त्याला बघ.
आरश्यासारख्या प्रतिमेची कमी होतेय किंमत,
नको ते भाव करून माणूस स्वतःची करतोय गंमत.
सुंदरता ही असते मनात,
फोटो पाहून कशी कळेल ती क्षणात.
नाही माहित सेल्फी बोलून तर बघा,
गावठी बोलून लोक हसतील हा हा हा!
जत्रेपेक्षा जास्त लोक सेल्फीसाठी जमतात,
भांडण झाले तरी सेल्फी हसून काढतात.
तोंड असेल वाकडे तर म्हणतात त्याला पाऊट,
दोघांच्याच सेल्फी पाहून घेतात लगेच डाऊट.
सेल्फीसाठी लोक हल्ली जगभर फिरतात,
पण आपल्या माणसासाठी जगणाऱ्या माणसालाच विसरतात.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग.

# आशय मराठमोळं नियतकालिकं

कळतच नाही मग माणूस कोणता खरा,
सेल्फीपेक्षा आपला आरसाच बरा.
निरखून पाहिल तर निदान खर रूप दिसत,
सेल्फीत तर काय रडकं माणूसही हसत.
फक्त मज्जा म्हणून हे सगळ वाटतं खूप गोड,
पण सेल्फ कमव माणसा सेल्फी काढणं सोड.
जगाशी कनेक्ट राहायला गरज नाही सेल्फीची
माणुसकी कमव मित्रा इथे कमी नाही मैत्रीची.

=

— अक्षता नारायण माने.

३० जुलै २०१९.

अंक पहिला

क.जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मराठी विभाग

# आशय मराठमोळं नियतकालिक